गुरुवार, १९ जानेवारी २०२३
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१५०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 19 JANUARY 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-150 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# दिवंगत आईच्या शोधात जखमी लेकराची वणवण

## आई कुणा म्हणू मी, आई घरी न दारी ! स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी !!

आधुनिक केसरी न्यूज

**जगदीश कस्तुरे**

**औरंगाबाद :** उपचारादरम्यान खासगी रुग्णालयात आईचा मृत्यू झाल्यानंतर तिला शोधण्यासाठी बाहेर पडलेल्या लेकराला जवाहरनगर पोलिसांनी जखमी अवस्थेत पाहिले आणि सर्वांचेच डोळे पाणावले. "आई कुणा म्हणू मी, आई घरी न दारी, स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी" अशा हृदयद्रावक ओळींतून कवी यशवंतांनी आई नसल्याचे दुःख व्यक्त केले होते. अशीच ही मन हेलावून टाकणारी कहाणी इंदूरच्या एका मुलाची आहे. निखिल गिरीराज सोनी (०३) असे या चिमुकल्याचे नाव आहे. सध्या तो औरंगाबादमध्ये विष्णूनगरात त्याच्या वडिलांसोबत आलेला आहे.

१६ तारखेला निखिलच्या आईचे उपचारादरम्यान सिग्मा हॉस्पिटलमध्ये निधन झाले. त्यानंतर १७ जानेवारी रोजी संध्याकाळी ५ वाजता अंत्यसंस्कारानंतर निखिल भांबावलेल्या अवस्थेत आईच्या शोधात घराबाहेर पडला. फिरत फिरत अरिहंतनगर, जवाहरनगर परिसरात आला. तिथे तो पडल्यामुळे त्याच्या डोक्याला जखम झाली व रक्त वाहू लागले. तेथील नागरिकांनी पोलिस नियंत्रण कक्षाला फोन करताच नियंत्रण कक्षाने जवाहरनगर पोलिसांना कळवले. पोलिस निरीक्षक व्यंकटेश केंद्रे यांनी अरिहंतनगरात धाव घेत मुलाला महिला पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले. त्याच्यावर उपचार केले. पोलिसांच्या वतीने सोशल मीडियावर सगळीकडे निखिलची माहिती व्हायरल करण्यात आली. पत्नीचे अंत्यसंस्कार आटोपून आल्यावर गिरीराज सोनी यांनी अवघ्या दोन तासांत जवाहरनगर पोलिस ठाणे गाठले आणि त्यांना घडलेली घटना सांगितली. ती ऐकून पोलिस ठाण्यातील सर्वांचेच डोळे पाणावले. त्यांनी निखिलला त्याच्या वडिलांच्या हवाली करत काळजी घेण्यास सांगितले. ही प्रशंसनीय कामगिरी पोलिस निरीक्षक व्यंकटेश केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दिलीप चंदन, पोलिस कर्मचारी प्रशांत शेळके, राहुल नागलोद, प्रेमा हाके यांनी पार पाडली.



# मस्तवाल पोलीस अधिकारी निलंबित

## नागरिक- नेत्यांच्या दबावामुळे गृहविभागाने विशाल ढुमे विरोधात उचलले पाऊल

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद : सहायक पोलिस आयुक्त विशाल ढुमे याने महिलेचा विनयभंग करत या महिलेच्या नातलगांना मारहाणही केली होती. लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या वाढत्या रोषानंतर या प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. अखेर नागरिकांचा वाढलेला दबाव आणि राजकीय नेत्यांनी केलेला हस्तक्षेप यामुळे गृहविभागाने त्याला निलंबित करण्याचे आदेश काढले आहेत.**



हॉटेलमध्ये जेवायला गेलेल्या पती-पत्नीला पोलीस अधिकारी असल्याची ओळख दाखवत विशाल ढुमेने लिफ्ट मागितली. दरम्यान कारमध्ये बसताच समोर बसलेल्या महिलेच्या अंगाला स्पर्श करुन विशाल ढुमेने तिचा विनयभंग केला. घराजवळ येताच पीडितेच्या बेडरूममध्ये जायचा हट्ट धरत विशाल ढुमेने नातेवाईकांना मारहाण केली. यावेळी नागरिकांनी 112 या क्रमांकावर कॉल करून पोलीस बोलावले असता ढुमेने त्या पोलिसांनादेखील धक्काबुक्की केली. मी पोलीस आयुक्तांच्या जवळचा आहे म्हणत विशाल ढुमेने शिवीगाळ केली. त्या दिवशी घडलेली संपूर्ण घटना घरातील कॅमेऱ्यात कैद झाली आहे. तर खाली पोलिसांच्या वाहनातदेखील विशाल ढुमे गोंधळ घालत असल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. या साऱ्या घटनेनंतर औरंदगाबाद शहर तापले होते. एसीपी ढुमे याला निलंबित करण्याची मागणी जोर धरु लागली होती. नागरिकांमध्ये कमालीचा रोष होता. अखेर नागरिकांसमोर गृह विभागाला झुकावे लागले. गृह विभागाने एसीपी ढुमेला निलंबित करण्याचे आदेश काढले.

### चर्चेतली बातमी

# हेलिकॉप्टर अपघातात युक्रेनच्या गृहमंत्र्यासह तीन मंत्री ठार



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** युक्रेनची राजधानी कीवमध्ये किंडरगार्टन जवळ एका हेलिकॉप्टरचा अपघात झाला. यामध्ये युक्रेनचे एक मंत्री, दोन लहान मुलांसह १६ जणांचा मृत्यू झाला आहे. बुधवारी पोलीस अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. युक्रेन पोलिसांचे प्रमुख इगोर क्लेमेंको यांनी सांगितले की सध्या १६ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती आमच्याकडे आहे. या १६ जणांमध्ये एक मंत्री, दोन लहान मुले आणि सरकारमध्ये काम करणारे काही वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश आहे. डेनिस मोनास्टिसस्की असे मृत्यू झालेल्या मंत्र्यांचे नाव आहे असेही इगोर यांनी सांगितले.

युक्रेनमध्ये एक हेलिकॉप्टर एका इमारतीला आदळलं त्यामुळे अपघात झाला. या हेलिकॉप्टरने पेट घेतला.

या घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला आहे. या भयंकर अपघाताचे व्हिडिओ ट्विटरवर शेअर केले जात आहेत.

डेनिस मोनास्टिसस्की हे युक्रेनचे गृहमंत्री होते. त्यांचाही या अपघातात मृत्यू झाला आहे. हेलिकॉप्टरचा अपघात नेमका कसा काय झाला? ते इमारतीला कसे धडकले हे अद्याप समजू शकलेले नाही. मात्र या अपघातात युक्रेनचे गृहमंत्री ठार झाले आहेत. ज्या ठिकाणी अपघात झाला तिथे मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे.

# महाराष्ट्राची शैक्षणिक गुणवत्ता खालावली

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कोरोना काळानंतर राज्यातील ग्रामिण भागातील शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक स्थिती खालावल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. प्रथम एज्युकेशन फाउंडेशनने देशभर केलेल्या 'ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट' (असर) या सर्वेक्षणात पाचवीतील साधारण ८० टक्के विद्यार्थ्यांना दोन अंकी संख्येची वजाबाकी आली नाही, तर ६५ टक्के विद्यार्थ्यांना भागाकार सोडवता आले नाही. पाचवीतील ४४ टक्के, तर आठवीतील २४ टक्के विद्यार्थ्यांना दुसरीच्या स्तराचे मराठी वाचन येत नसल्याचे उघड झाले आहे. कोरोनाकाळापूर्वी झालेल्या (२०१८) सर्वेक्षण अहवालाच्या तुलनेत किमान क्षमता विकसित झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ८ ते १० टक्क्यांनी घटले आहे. पायाभूत सुविधांची उपलब्धताही कमी झाली आहे. प्रथम फाउंडेशनच्या वतीने देशभरातील शालेय शैक्षणिक परिस्थितीचे सर्वेक्षण करण्यात येते. पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी वयानुसार भाषा आणि गणित या विषयांतील आवश्यक क्षमता आत्मसात केल्या आहेत का, याची पाहणी या उपक्रमामध्ये करण्यात आली. दरवर्षी करण्यात येणाऱ्या या सर्वेक्षणात कोरोना काळात खंड पडला होता. यापूर्वी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात पाहणी करण्यात आली. त्यानंतर यंदा (२०२२-२३) या वर्षातील शैक्षणिक अहवाल जाहीर करण्यात आला आहे. कोरोना काळात विद्यार्थी शाळांपासून दुरावले. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या क्षमता विकासावर झाल्याचे दिसून येते आहे.

# औरंगाबादेत तृतीय पंथीयांचा उच्छाद; पोलीस हतबल

## वाहनधारक संतप्त; कारवाई करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

औरंगाबाद : शहरातील सेव्हनहिल्स, सिडको, शिवाजीनगर परिसरातील वाहतूक सिग्नलवर तृतीय पंथीयांनी उच्छाद मांडला असून पोलिसही या प्रकरणात बघ्याची भूमिका घेत असल्यामुळे दुचाकीस्वार व चारचाकी वाहनधारक त्रस्त झाले आहेत.

रेड सिग्नल सुरु झाल्यावर थांबलेल्या वाहनधारकांशी तृतीयपंथी असभ्य वर्तन करतात. अनेकदा दुचाकीवर महिला-मुली असतात त्यांच्याशी ते लगट करतात. या प्रकाराला आळा घातला जावा, अशी शहरवासीयांची तीव्र इच्छा आहे.

रोज सकाळी १० ते ४ व संध्याकाळी ५ ते ८ या वेळेत प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो. हे तृतीयपंथी वाहनधारकांना नको त्या ठिकाणी स्पर्श करतात. त्यामुळे वाहतूक नियमांचे पालन करता येत नाही आणि आपोआप पोलीस दंडात्मक कारवाई करतात. मुख्य प्रश्न असा आहे की, हे लोक शहरात येतात कोठून व एवढी दादागिरी करून भीक मागतात व पोलीस हतबलपणे का पाहातात ? या विषयी पोलीस अधिकारी, वकील, राजकीय पक्षाचे पदाधिकारी यांनी गमतीशीर प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत.




नागरिकांनीच पुढाकार घेत तृतीयपंथीयांवर कशी कारवाई करायला पाहिजे ते सुचवावे . अनेक नागरिक त्यांच्या शिव्या शापाला घाबरून त्यांना पैसे देतात . त्यामुळे त्यांची हिम्मत वाढते . कायद्यामध्ये या प्रकाराला आळा घालण्यासाठी तरतूद नाही .
**शिलवन्त नांदेडकर, पोलीस उपायुक्त, झोन कर . २**


या प्रकरणात पोलिसांनी कलम ३४१ अंतर्गत गुन्हे दाखल करायला पाहिजे, तसेच ५ पेक्षा अधिक तृतीयपंथी असल्यास कलम १४७ प्रमाणे बेकायदा मंडळी जमविल्या प्रकरणी गुंडगिरीचा गुन्हा दाखल करता येतो . **ॲड . प्रशांत नागरगोजे**

या प्रकरणात संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांनी बेगर्स ॲक्टप्रमाणे गुन्हे दाखल करून सहकार्य केले पाहिजे . **पो . नि .जनार्दन शेवाळे, वाहतूक विभाग**

अनेक सिग्नलवर तृतीय पंथीयांना घाबरून नागरिक पैसे देऊन टाकतात ही वस्तुस्थिती आहे . अनेकांच्या श्रद्धा या तृतीयपंथीयांवर असतात .
**लीला राजपूत, मनसे पदाधिकारी**

## उगवतीचे रंग





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## तुमची देहबोली सांगते तुमच्याबद्दल




आधुनिक केसरी

म्हणून आपल्याला काय शोभून दिसेल याचेही भान आपण ठेवले पाहिजे. तसेच आपल्या शरीराचा, कपड्यांचा गंधही महत्वाचा. श्वासाला, कपड्यांना दुर्गंधी येत असेल तर ती गोष्ट समोरच्या व्यक्तीसाठी त्रासदायक ठरू शकते. तसेच कपड्यांवर मारलेला उग्र सेंट, तोंडाला पान, गुटखा, इ चा वास समोरच्याला नकोसा होतो. जाते. आपला हा अभ्यास जसजसा वाढेल तसतसे आपण या देहबोलीच्या भाषेशी परिचित होत जाऊ. त्यासाठी आपली निरीक्षणशक्ती चांगली असणे आणि जाणीवपूर्वक वाढवणे आवश्यक आहे.Just don't see only, try to observe. केवळ पाहणे आणि निरीक्षण करणे यात फरक आहे. याचा अर्थ समोरच्या व्यक्तीचे अगदी टक लावून निरीक्षण करायला पाहिजे असे नाही. नाहीतर ती व्यक्ती अस्वस्थ होईल. असे निरीक्षण आपल्याला हळूहळू सवयीने जमू शकेल. यासाठी उत्तम ठिकाण म्हणजे जेथे गर्दी असते ती ठिकाणे. रेल्वे स्टेशन, बस स्थानक, बगीचा इ ठिकाणे. अशा ठिकाणी जाऊन सहज बसल्या बसल्या आपल्याला समोरच्या व्यक्तींचे निरीक्षण करता येईल व सवयीने हा अभ्यास वाढवता येईल. त्यातून आपल्या व्यक्तिमत्वात सुधारणा करण्याची दिशाही आपल्याला मिळेल. म्हणून माणसे नुसती बघायला नाही तर वाचायला शिका. प्राचीन काळातील इतिहास जाणून घ्यायचा असेल तर विविध मंदिरातील मूर्ती, लेण्यातील चित्रे इ गोष्टी खूप काही सांगून जातात. त्या त्या व्यक्तींच्या देहबोलीतूनच आपल्याला इतिहास उलगडतो. खजुराहो सारख्या ठिकाणची आणि इतर ठिकाणच्या मंदिरातही बऱ्याच ठिकाणी सुंदर शिल्पे आपल्याला आढळतात. या सगळ्या मूर्ती किंवा शिल्पे देहबोलीच्या महत्वाकडेच निर्देश करतात. भरतमुनींनी आपल्या ' नाट्यशास्त्र ' या ग्रंथात देहबोलीच्या दृष्टीकोनातून शरीराच्या विविध अवयवांचे जसे डोळे, ओठ. चेहऱ्यावरील हावभाव, भुवयांची हालचाल, हातांच्या मुद्रा इ. चे सविस्तर वर्णन केले आहे. जिंकले या अर्थाची एक इंग्रजी म्हण आहे. He came, he saw and he conquered हे वाक्य त्याच गोष्टीकडे अंगुलीनिर्देश करते.

**क्रमशः**

## आनंदी पहाट



## मानसिक जीवनशैलीचे महत्व समजून घ्यावे

आधुनिक केसरी

आपल्या स्वप्नातल्या व्यक्तिमत्वाचं वेगळेपण अनुभवताना, त्यासाठी जीवनशैली निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणं आवश्यक असतं. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगानं कारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अर्थात सरधोपटपणे केलेल्या विचारांत सकारात्मकता असतेच असं नाही. पण आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणं आवश्यक असतं. त्यासाठी एक हक्काचं ठिकाण म्हणजे आपलं घर. घर केवळ चार भिंतींचं नसतं, घराचं घरपण आपण मिळवायचं असतं, त्या घरात मनाला रमवायचं असतं. आपल्याच घरात रोज नवं काहीतरी आजमावायचं असतं. मनाला रमवण्यासाठी आणि नवं आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. आपल्या अंतर्मनातील आनंद निर्माण करण्याची बाब ही जितकी महत्वाची असते तितकंच सौंदर्याला देखील महत्व असतं. आपण आपल्या जीवनात सौंदर्याचा शोध घेत असतो तेव्हा ते अधिकाधिक कसं मिळवता येईल ह्यासाठीच प्रयत्नशील असतो. सुंदरता, ही आपल्या प्रत्येक गोष्टीकडे बघण्याच्या दृष्टीकोनावर अवलंबून असते. प्रत्येक गोष्ट ही सुंदरच असते, अशा सकारात्मक दृष्टीने आपण बघितलं की अशावेळी त्या गोष्टी मध्ये सौंदर्याचा साक्षात्कार व्हायला लागतो. आपल्या जीवनामधील सौंदर्याचं स्थान आणि महत्व हे तेव्हाच आपण अनुभवू शकतो. आनंद मिळवून जीवन जगण्यातच आपलं मनःस्वास्थ्य टिकून राहू शकतं. आपण आपलं मानसिक स्वास्थ्य मिळवणं आणि ते टिकवून ठेवणं हे सर्वस्वी आपल्याच मानसिकतेवर, अंतर्मनातील विचारांवर अवलंबून असतं. आपल्या

अंतर्मनाला आनंदी ठेवण्यातच आपलं मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवता येतं. तो आनंद आपण स्वतःच निर्माण करायचा असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### तुकाई जोजवी | अभंगात

तुजविण रूप | न दिसो डोळा ||
अंतरी उमाळा | दाटो तुझा ||१||
दुष्कर्मा पासोनी | दूर राही मना ||
विकारी कामना | घात करी ||२||
सत्संगावचोनी | नाही सोडवण ||
गळावे मी पण | निरंतर ||३||
सत्कर्माची गोडी | लागो मज नित्य ||
हरिनाम सत्य | जाण जीवा ||४||
ज्ञानाई गाते ही | लडीवाळ ओवी ||
तुकाई जोजवी | अभंगात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

**जीवन तुझे आणि जगणारही तूच. मग कशाला यश स्वतःचे आणि अपयश दुसऱ्याचे म्हणून सांगतोस? अरे, यश असो वा अपयश. जे असेल ते खुशाल सांग. अपयशाला स्वीकारल्याविना ते तुझी पाठ सोडणार नाही.**

**भूतकाळ हा विजयी लोक ओळखू येणाऱ्या लोकांचा, वर्तमानकाळ हा विजयासाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांचा आणि भविष्यकाळ हा विजयाची शक्यता ओळखणाऱ्या लोकांचा असतो. कोणीतरी आपल्यासाठी लढेल असे ज्यांना वाटते त्यांच्यासाठीचा कोणताही काळ कोणत्याही देशात अस्तित्वात नाही.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज


**माप नाप सब अन्त है, बुद्धि विज्ञानप शान्त।**
**सत्ता पूर्ण अनन्त है, सर्व अनन्त अनन्त**
**।।३०।। (स्वर्वेद चतुर्थ मण्डल चतुर्दश अध्याय) ०४/१४/३०**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

जीव, बुद्धी द्वारा जे काही ज्ञान प्राप्त करतो, त्या सर्वाचा आधार, सीमा आहे आणि ते सर्व ज्ञान परिमित, सीमित आहे. पूर्ण परमप्रभू अनंत आहेत तसेच त्यांच्या सर्व क्रिया आणि गुणही अनंत आहेत.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## काव्य-चरितावली



पुष्प १०वे

आधुनिक केसरी


**लग्नानंतर नंतर आता तरी**
**श्रीमहाराज रहातील घरी**
**करतील मदत वडिलांना**
**सांभाळतील त्यांची कचेरी ।।**
**गुरू शोधण्याची मनी ओढ**
**ध्यानात वेळ जाऊ लागला**
**पंत आजोबांचा उद्देश सारा**
**शेवटी विफलच की हो झाला ।।**
**श्रीमहाराजांच्या मनातील या**
**तीव्र ओढीला घरचे कुणी ना**
**नाहीच समजू शकले, शेवटी**
**आईस सांगून,घराबाहेर पडले ।।**
**लंगोटी हेच वस्त्र हो अंगावरी**
**अखंड रामनाम ते ओठावरी**
**पोटापूरती मागती माधुकरी**
**गुरूंचा शोध सुरू झाला भूवरी ।।**
**अक्षरसेवा सादर श्रीगुरुचरणी**
**आनंद होई अरुणदासाच्या मनी ।।**



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## नाम निष्ठेने घ्यावे

आधुनिक केसरी



नाम श्रद्धेने घेणे म्हणजे काय ? तर आपल्या गुरूने, किंवा ज्याच्याबद्दल आपली पूज्य भावना असते अशा व्यक्तीने, सांगितले म्हणून घेणे. अशा श्रद्धेने नाम घेणाऱ्याच्या मनात शंका येत नाही. ही स्थिती फार भाग्याची, पण तितकीच दुर्मिळ. निष्ठेने नाम घेणे म्हणजे शंकारहित नाम घेणे. शंका अनेक तऱ्हेच्या असतात. नाम घेताना भगवंताकडे लक्ष नसले तर त्या नामाचा उपयोग आहे की नाही, नाम घेताना बैठक कोणती असावी, दृष्टी कशी असावी, शुचिर्भूतपणेच नाम घ्यावे किंवा कसे, अशा तऱ्हेच्या अनेक शंका मनात येतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, आपण जे नाम घेतो ते भगवंतापर्यंत पोहोचते की नाही, ह्या एका शंकेत सर्व शंकांचा समावेश होतो. भगवंत आणि त्याचे नाम एकरूपच असल्याने त्या दोहोंच्या आड काहीच येऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तीच्या पाठीमागून आपण चाललो असताना आपल्या तोंडून त्याचे नाव उच्चारले गेले तर तो लगेच मागे वळून बघतो. ही जर मनुष्याची स्थिती, तर भगवंताच्या बाबतीत त्याचे नाव त्याच्यापर्यंत पोहोचत नाही हे कसे शक्य आहे ? खरे पाहिले तर भगवंताचे नाव त्याच्याच कृपेने आपल्या मुखात येते; म्हणजे त्याचे नाव तोच घेत असतो; मग नाम भगवंतापर्यंत पोहोचते की नाही ह्या शंकेला वावच कोठे राहिला ? समजा, दोन माणसे जेवायला बसली. त्यांतल्या एकाच्या मनात काही विचार घोळत असून त्याचे जेवणाकडे लक्ष नव्हते, पण हाताने तोंडात एकेक घास घालण्याचे काम चालू होते. दुसरा इसम मात्र लक्षपूर्वक जेवण जेवीत होता. दोघेही जेवून उठले. ह्यात उपाशी कोण राहिला ? दोघांचीही पोटे भरलीच ! तसे, नाम घेतल्यानंतर त्याचा उपयोग झाला नाही असे कसे होईल ?

समजा, आपण परगावच्या एका अनोळखी इसमाला पत्र लिहून त्याला बोलाविले; तो आला, आणि त्याने सांगितले की, ' तुम्ही ज्याला पत्र पाठविले तोच मी ', तर त्याच्या वचनावर विश्वास ठेवून आपण त्याला जवळ करतो. तसे, भगवंताने सांगितले आहे की, ' जेथे माझे नाम तेथे मी पुरुषोत्तम '; तर मग या वचनावर विश्वास ठेवून नाम घ्यावे आणि त्यातच त्याला पहावे, असे का करता येऊ नये ? हीच श्रद्धा. आपण ज्याचे पोटी जन्माला आलो त्याचेच नाव आपण आपल्या नावापुढे लावतो, तसे भगवंताच्या बाबतीत करावे. त्याचेच नावाने जगावे; म्हणजे माझा सर्व कर्ता, रक्षिता, तो एकच असून, त्याच्याशिवाय माझे या जगात दुसरे कोणीही नाही, या भावनेने राहावे. असा जो भगवंताचा होतो, त्याचे महत्त्व भगवंत स्वतःपेक्षाही जास्त वाढवतो.

**आजचे बोधवचन आहे - नामाने भगवंताची प्राप्ती होणार ही खात्री असावी. अशा नामालाच ' निष्ठेचे नाम ' असे म्हणतात. श्रीराम समर्थ**

## हरिपाठ

आधुनिक केसरी

नामाचे महात्म्य इतके अपूर्व आहे की, नाम उच्चारणारा व ते ऐकणारा दोघेही उध्दरून जातात. वेळ मिळाला की नाम घेतले पाहिजे.

## चर्चेतली बातमी

# खासदाराने उघडला आपत्कालीन दरवाजा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** नेपाळमधील विमान अपघातामुळे संपूर्ण जग हादरले आहे. या अपघातात सर्व ६८ प्रवासी तसेच ४ क्रू मेंबर्स यांचा मृत्यू झाला. ही घटना ताजी असतानाच एका प्रवाशाने इंडिगो एअरलाईन्स या हवाई वाहतूक कंपनीच्या विमानाचा आपत्कालीन दरवाजा अचानकपणे उघडल्याचे समोर आले आहे. ही घटना १० डिसेंबर रोजी घडली होती. विशेष म्हणजे विमानाचा आपत्कालीन दरवाजा उघडणारी व्यक्ती ही भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष तथा भाजपाचे खासदार तेजस्वी सूर्या असल्याचे म्हटले जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार विमानोड्डाण होण्याच्या काही क्षणांअगोदर प्रवाशाने विमानाचा आपत्कालीन दरवाजा उघडला होता.

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र विमानाला उड्डाण घ्यायला साधारण अडीच तासांचा उशीर झाला. साधारण एका महिन्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे. याच विमानातून तामिळनाडू भाजपाचे प्रदेशाध्यक्ष के अण्णामलाई यांच्यासोबत तेजस्वी सूर्या प्रवास करत होते. याच कारणामुळे उड्डाण घेण्याअगोदर विमानाचा आपत्कालीन दरवाजा उघडणारे प्रवासी हे भाजपाचे खासदार तेजस्वी सूर्या असल्याचे म्हटले जात आहे. इंडिगो एअरलाईन्सने मात्र निवेदनात कोणाचेही नाव घेतेलेले नाही. मागील वर्षाच्या १० डिसेंबर रोजी नियोजित वेळेनुसार सकाळी १०.०५ वाजता विमान उड्डाण घेणार होते.

# सर्वसामान्यांना सोबत घेऊन काम करणारा कार्यकर्ता हरपला : नाना पटोले

## जयप्रकाश छाजेड यांना प्रदेश काँग्रेसची श्रद्धांजली, शोकसभेत आठवणींना उजाळा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तसेच महाराष्ट्र इंटकचे अध्यक्ष जयप्रकाश छाजेड यांचे आकस्मिक निधन मोठा धक्का देऊन गेले. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत छाजेड काँग्रेस विचारासाठी व कामगारांसाठी काम करत राहिले. तळमळीने तसेच सर्वसामान्यांना सोबत घेऊन काम करणारा कार्यकर्ता आज आपल्यात नाही, अशा भावना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केल्या आहेत.**



काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व महाराष्ट्र इंटकचे अध्यक्ष माजी आमदार स्वर्गीय जयप्रकाश छाजेड यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने टिळक भवन, दादर येथे शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मंत्री विजय वडेट्टीवार, मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष आ. भाई जगताप, मा. खा. हुसेन दलवाई, रेल्वे युनियनचे प्रविण वाजपेयी, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व सहप्रभारी आशिष दुआ, सोनल पटेल, प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश सरचिटणीस प्रमोद मोरे, देवानंद पवार, राजेश शर्मा, राजन भोसले, जो. जो. थॉमस, प्रा. प्रकाश सोनावणे, आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण म्हणाले की, जयप्रकाश छाजेड शेवटपर्यंत पक्षाचे व इंटकचे काम प्रामाणिकपणे करत राहिले. ज्या दिवशी निधन झाले त्या दिवशीही ते नागपूरमधील कार्यकारिणीच्या सभेला जाण्याची तयारी करत होते. छाजेड यांच्याबरोबर एकत्र काम केले. कामगार वर्गासाठी लढा देणे हे सोपे काम नाही परंतु महाराष्ट्र इंटकच्या माध्यमातून त्यांनी कामगारांसाठी चांगले काम केले. एस. टी. कामगारांचे प्रश्नही ते वेळोवेळी लावून धरायचे. शासनाकडे सतत पाठपुरावा करून कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. विधान परिषदेतही त्यांनी कामगारांचे प्रश्न हिरीरीने मांडले. त्यांचा दांडगा जनसंपर्क होता, लोकांशी ते सतत जोडलेले असत. कामगार क्षेत्राबरोबर सामाजिक, सांस्कृतीक क्षेत्रातही ते कार्यरत असत. जयप्रकाश छाजेड यांचे निधन झाले असले तरी त्यांच्या आठवणी कायम स्मरणात राहतील. मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष आमदार भाई जगताप म्हणाले की, जयप्रकाश छाजेड हे एखादी जबाबदारी स्विकारली की ती तडीस नेत असत. कामगार, कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर त्यांनी मोठे काम केले.

# मराठी साहित्यविश्व व शेतीमधल्या वास्तविकतेचा शोध घेण्यासाठी संमेलनाचे आयोजन

## अ.भा. शेतकरी साहित्य संमेलनाचे संस्थापक तथा कार्याध्यक्ष गंगाधर मुटे यांच्याशी खास संवाद

आधुनिक केसरी




**औरंगाबाद : कल्पनाविश्वात रमणाऱ्या आभासी शेती साहित्याचा प्रत्यक्ष शेतीक्षेत्राशी काही संबंध उरला आहे किंवा नाही याचा आढावा घेण्यासाठी, मराठी साहित्यविश्व व शेतीमधली वास्तविकता याचा उहापोह करण्यासाठी, नवसाहित्यिकांना सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि शेतीक्षेत्राला मराठी साहित्यक्षेत्राप्रती असलेल्या अपेक्षांची जाणीव करून देण्यासाठी आयोजित दहाव्या अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे आयोजन दि. 21 व22 जानेवारी गुरुकुंज मोझरी येथे करण्यात आले आहे. अशी माहिती अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष गंगाधर मुटे यांनी आधुनिक केसरीशी संवाद साधत व्यक्त केली.**

आजपर्यंत मराठी साहित्य चळवळ, प्रादेशिक भाषा साहित्य चळवळ, ग्रामीण साहित्य चळवळ, कामगार साहित्य चळवळ, दलित साहित्य चळवळ अशा अनेक व नानाविध साहित्य चळवळी निर्माण झाल्या, अ.भा. स्तरावर साहित्य संमेलने झालीत पण या देशाचा 'कणा' असलेल्या शेतीची अ.भा. शेतकरी साहित्य चळवळ मात्र कधी उभी राहिली नाही. ज्या देशात बहुतांश जनतेचे उदरनिर्वाहाचे आणि उपजीविकेचे साधन शेती हेच आहे, त्याच देशात सर्वात जास्त उपेक्षा शेतीचीच व्हावी, हा दुर्दैवविलास आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक या क्षेत्राबरोबरच साहित्य क्षेत्रातही शेती क्षेत्राची पीछेहाट झाल्यामुळे निकोप शेतीविषयक मानसिक मनोभूमी तयार होण्यास व शेती व्यवसायाविषयी समाजमनाची सकारात्मक मानसिकतेची जडणघडण होण्यास मारक ठरलेले आहे. साहित्यातून समाजाच्या सामुहिकमनाचे वास्तव प्रतिबिंबित व्हायला हवे; पण मागील काही वर्षाचा शेतीसंबंधित साहित्यिक आढावा घेतला तर ते सुद्धा झालेले दिसत नाही. "साहित्य हा समाजाचा आरसा असतो" असे म्हणतात. ते जर खरे असेल तर साहित्यात समाजातील वास्तवतेचं, वास्तवतेच्या दाहकतेचं प्रतिबिंब उमटायलाच हवं ना? पण गेल्या १५-२० वर्षांमध्ये देशात ६ लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत; पण त्याची दखल साहित्यक्षेत्राने गांभीर्याने घेतलेली दिसत नाही किंवा त्याचे प्रतिबिंब साहित्यात प्रभावीपणे उमटलेले सुद्धा आढळत नाही. शेतीतील गरिबीचे, ग्रामीण भारतातील दुर्दशेचे खरेखुरे कारण सांगणारे आणि तशी अभ्यासपूर्ण मांडणी करून योग्य मूल्यमापन करणारे पुस्तक एक शरद जोशी सोडले तर साहित्यक्षेत्रात उपलब्ध नाही. विदर्भप्रदेश गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी आत्महत्यांमध्ये होरपळत आहे पण शेतकरी आत्महत्यांवर सर्वंकश प्रकाश टाकणारे, खोलवर अभ्यासपूर्ण मांडणी करून शेतकरी आत्महत्यांच्या कारणांचा शोध आणि मागोवा घेणारे आज एकही पुस्तक उपलब्ध नसणे ही बाब साहित्यक्षेत्रासाठी शोभादायक नाही. साहित्यक्षेत्रातील ही शेतीसाहित्याची उणीव भरून काढण्यासाठी शेतीशी प्रामाणिक व कटिबद्ध असणाऱ्यांनो लेखक-कवी-गझलकारांनी आता सर्व बंधने झुगारून, स्वतःचा अहंकार बाजूला सारून, वास्तवनिष्ठ, शास्त्रशुद्ध व तर्कसंगत विचाराची अत्युच्च पातळी गाठण्यासाठी प्रथम अभ्यासाला लागले पाहिजे. अभ्यासाला अनुभवाची जोड दिली पाहिजे. आपल्याला जे लिहायचे आहे ते लिहिण्यापूर्वी शेतीअर्थशास्त्राच्या कसोटीवर तपासले पाहिजे. आपण जे लिहिणार असू ते शेतीची बिकट समस्या सोडवण्यासाठी उपयोगी की उपद्रवी याचेही मंथन केले पाहिजे आणि नंतरच लेखनाला सुरुवात केली पाहिजे. काळ्या मातीशी इमान राखणारे लेखन करायचे असेल तर सृजनशीलतेला पहिल्यांदा भ्रामक कल्पनांतून बाहेर काढले पाहिजे. लेखनशैलीचा उपजतपणा, स्फूर्ती, प्रतिभा व परकाया प्रवेश वगैरे कल्पनांना टाळून कृत्रिम का होईना पण वास्तवाला चितारणारी अभ्यासपूर्ण लेखनशैली जाणीवपूर्वक विकसित करण्यासाठी सज्ज झाले पाहिजे.

साहित्यक्षेत्रात आजपर्यंत झालेले लेखन बहुतांशी "शेतीच्या शोषणाला पोषक" असेच लिहिल्या गेलेले आहे आणि "मला जे स्फुरले ते मी लिहिले" हाच दृष्टिकोन त्याला मुख्यत्वे कारणीभूत आहे. साहित्य म्हणजे केवळ वाचकांच्या करमणुकीसाठी लिहायचे नसते, स्वतःला महानतेकडे पोचविण्यासाठी व स्वतःचे लेखन साम्राज्य वाढविण्यासाठी तर अजिबातच लिहायचे नसते. वाचकाची दिशाभूल करण्याऐवजी त्याला विषयाची योग्य जाणीव करून देण्यासाठी लिहायचे असते, याचा विसर पडल्याने दमदार शेतीसंबंधित साहित्यकृती निर्माण झालेली नसावी, असे समजायला बराच वाव आहे. केवळ आरशासारखी मर्यादित भूमिका सुद्धा साहित्याची असू नये. समाजमनाच्या सामूहिक जडणघडणीचे व मानवीमूल्यांच्या उत्क्रांतीचे उगमस्थान साहित्य हेच असते कारण मनुष्य जन्माला घालण्यापूर्वी माणसाला एखाद्या विषयात पारंगत करायची देवाकडे अथवा निसर्गाकडे कुठलीही व्यवस्था नाही. त्यामुळे जन्माला आल्यानंतर कुठल्याही माणसाला कुठलाही विषय ज्ञात करून घ्यायचा असेल तर त्याच्यासमोर "साहित्य" हाच एकमेव पर्याय आहे. अनेकजण मानवीमूल्यांच्या जडणघडणीसाठी 'संस्कार' महत्त्वाचा मानतात. पण ते सत्य नाही कारण संस्कार देणाऱ्याची मानसिक व वैचारिक जडणघडण सुद्धा साहित्यातून झालेली असते. संस्कार देणाऱ्या व्यक्तीचीच जर साहित्याने दिशाभूल केली असेल तर दिले जाणारे संस्कार हे निर्दोष सुसंस्कार नसून सदोष कुसंस्कारच असणार हे उघड आहे. निकोप मानसिकतेचा समाज घडविण्याचे काम मुळात साहित्याचे आहे. म्हणून लेखनी हाती घेऊन खरडणारांना सामाजिक वास्तविकतेचे भान असणे ही मूलभूत गरज साहित्यिकांसाठी अनिवार्य मानली गेली पाहिजे.

वास्तवतेशी प्रतारणा करून आभासी विश्वात रमणाऱ्या व कल्पनाविलासाचे मनोरे रचून केवळ पुरस्कार, पारितोषिकांकडे टक लावून बसलेल्या बाजारी साहित्यिकांकडून शेतीला न्याय मिळण्याची शक्यता नसेल तर आता प्रत्यक्ष शेतकऱ्यांनीच समोर आलं पाहिजे. आमचं आयुष्य जगलो आम्ही, आमचं आयुष्य भोगलं आम्ही. रक्ताचं पाणी करून राबलो आम्ही, हाडाची काडं करून झिजलो आम्ही..... अनुभूती आमची आणि आम्ही म्हणतो आम्ही लिहिणार नाही. दुसऱ्याने कुणीतरी लिहावं! पिढ्यानपिढ्या उलटून गेल्या पण आमचा शेतकरी बोलायला तयार नाही. मुळात भारतातील शेतकरी मुकाच आहे. तो बोलत नाही, लिहीत नाही आणि वाचतही नाही. हे चित्र बदलायचं असेल तर शेतकऱ्यांनी एका हातात नांगर आणि दुसऱ्या हातात लेखनी धरली पाहिजे. हा संदेश देण्यासाठीच या संमेलनाचे प्रयोजन आहे. समाजाची मानसिक जडणघडण व वैचारिक उत्क्रांतीची दिशा बदलण्याची ताकद साहित्यात आहे आणि साहित्याला बदलण्याची ताकद शेतकऱ्यांच्या मनगटात .....!

म्हणून.... काळ्याआईच्या कष्टकऱ्यांनो, उपेक्षितांच्या सहकाऱ्यांनो, हक्कासाठी लढणाऱ्यांनो, लोकशाहीच्या पहारेकऱ्यांनो, स्वप्नं उद्याचे बघणाऱ्यांनो, नव्या युगाच्या निर्मात्यांनो, चला जरासे खरडू काही.. काळ्याआईविषयी बोलू काही.. यासाठी आपण प्रयत्नशील राहूया अशी हाक आधुनिक केसरीशी संवाद साधत गंगाधर मुटे यांनी व्यक्त केली.

# महाराष्ट्राच्या बदनामीचा ठाकरे कुटुंबाचा कट उद्योगविश्वाने उधळला

## आ. प्रवीण दरेकर यांची टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उद्योगक्षेत्रात महाराष्ट्राची नकारात्मक प्रतिमा निर्माण करण्याचा ठाकरे पितापुत्रांचा कट उद्योगक्षेत्रानेच उधळून लावल्याचे दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रास मिळालेल्या उदंड प्रतिसादावरून स्पष्ट झाले आहे. परिषदेच्या पहिल्याच सत्रात महाराष्ट्रात १.३७ लाख कोटींच्या औद्योगिक गुंतवणुकीचे सामंजस्य करार करून जागतिक उद्योगक्षेत्राने महाराष्ट्राला पसंतीची पावती दिली असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर विश्वास दाखविला आहे, असे प्रतिपादन विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते, भाजपा आ. प्रवीण दरेकर यांनी बुधवारी केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश सचिव अखिलेश चौबे, माध्यम प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते आसिफ भामला यावेळी उपस्थित होते. गेल्या वर्षी मे महिन्यात झालेल्या परिषदेकडे तेव्हाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पाठ फिरवली, तर आदित्य ठाकरे यांनी या परिषदेच्या निमित्ताने स्वित्झर्लंडची पिकनिक पार पाडली होती, असा टोलाही आ. दरेकर यांनी मारला.

महाराष्ट्रातील उद्योग राज्याबाहेर जात असल्याचा खोटा प्रचार करून उद्धव आणि आदित्य ठाकरे यांनी शिंदे-फडणवीस सरकारविरोधात प्रचाराची राळ उठवली होती. मात्र, ठाकरे कुटुंबाचे आरोप धादांत खोटे केवळ राजकीय वैफल्यातून होत असल्याचे वारंवार स्पष्ट झाले. आता दावोस परिषदेत महाराष्ट्रास मिळालेल्या प्रतिसादामुळे ठाकरे पितापुत्रांचा महाराष्ट्रास बदनाम करण्याचा कट उधळला गेला आहे, असा प्रतिहल्ला त्यांनी केला.

गेल्या वर्षीच्या परिषदेत आदित्य ठाकरे यांनी केलेल्या गुंतवणुकीच्या करारानुसार ते उद्योग राज्यात यावेत यासाठी ठाकरे सरकारने काहीच पाठपुरावा केला नाही, उलट याच काळात महाराष्ट्राची बदनामी करून उद्योगक्षेत्रात महाराष्ट्राविषयी अविश्वासाचे वातावरण निर्माण करण्याचा कट आखला, असा आरोप करून आ. दरेकर म्हणाले की, दावोस परिषदेत मुख्यमंत्री शिंदे यांनी पहिल्याच सत्रात विविध उद्योगांकरिता महाराष्ट्राची दारे खुली करून १.३७ लाख कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करारही केले आहेत. यातून रोजगाराच्या सुमारे एक लाख थेट संधी निर्माण होतील. गेल्या वर्षी आदित्य ठाकरे यांनी केलेल्या करारांचा पाठपुरावा करून उद्योगांना पोषक वातावरण तयार केले असते, तर राज्याच्या विकासाचे चक्र उलटे फिरले नसते, असे ते म्हणाले.

# भारत नं. 1

आधुनिक केसरी

जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश म्हणून चीनकडे पाहिले जाते. मात्र भारताने लोकसंख्येच्या बाबतीत चीनला मागे टाकले आहे. ब्लूमबर्गने वर्ल्ड पॉप्युलेशन रिव्ह्यूच्या अंदाजाचा हवाला देत हे म्हटले आहे. ही जनगणनेवर लक्ष ठेवणारी स्वतंत्र संस्था आहे. वर्ल्ड पॉप्युलेशन रिव्ह्यूया संस्थेने दिलेल्या अंदाजानुसार २०२२ च्या शेवटापर्यंत भारताची लोकसंख्या १.४१७ बिलियन म्हणजे सुमारे १४१ कोटींहून अधिक होती. ही संख्या मंगळवारी चीनने सादर केलेल्या अहवालापेक्षा ५० मिलियनने जास्त आहे. चीनने जो अहवाल दिला त्यात त्यांची लोकसंख्या १.४१२ बिलियन असल्याचे म्हटले आहे. भारतातली जी वाढती लोकसंख्या आहे त्यातला एक मोठा भाग ३० वर्षांखालील आहे. येत्या वर्षांमध्ये जगात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थेचा भाग हे सगळे लोक होणार आहेत. भारताची लोकसंख्या एप्रिल २०२३ पर्यंत १४३ कोटींच्या पुढे जाईल. त्यामुळे भारताने चीनला लोकसंख्येच्या बाबतीत कधीच मागे टाकलं आहे. इतर देशांच्या तुलनेत भारतात लोकसंख्या वाढीचा दर सर्वाधिक आहे. २०२२ मध्ये जगभरात १३ कोटी मुलांचा जन्म झाला. त्यातली अडीच कोटी मुले एकट्या भारतात जन्माला आली आहेत. चीनमध्ये ही संख्या काही लाखांच्या घरात होती. हिंदुस्थान टाइम्सने हे वृत्त दिले आहे.ब्लूमबर्गच्या अहवालानुसार चीन सध्या वाढलेल्या लोकसंख्येच्या गंभीर समस्येशी झुंज देतो आहे. चीन मध्ये गेल्या वर्षी म्हणजेच २०२२ मध्ये १.४१ बिलियल लोक होते. २०२१ च्या शेवटाच्या तुलनेत ही संख्या साडेआठ लाखांनी कमी होती. १९६१ नंतर पहिल्यांदाच चीनमध्ये लोकसंख्या वाढीचा दर घसरला आहे. चीमध्ये २०२२ या वर्षात ९० लाख ५६ हजार मुलांचा जन्म झाला. तर १ कोटी ४१ हजार लोकांचा चीनमध्ये गेल्या वर्षी मृत्यू झाला. चीनमध्ये लोकसंख्या घटू लागली आहे त्यामुळे आर्थिक स्तरावर गंभीर परिणाम होऊ शकतो. चीनमध्ये जन्माला येणाऱ्या मुलांची संख्या कमी आहे. तर वयस्कर झालेल्या लोकांची संख्या जास्त झाली आहे. त्यामुळे येत्या काळात चीमध्ये काम करणाऱ्या आणि अर्थचक्राला गती देणाऱ्या तरुणांची संख्याही कमी झाली असेल. याचा परिणाम चीनच्या अर्थव्यवस्थेवर होईल यात काहीही शंका नाही.

# दाऊद भारताच्या हाती का लागत नाही ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम हे जागतिक दहशतवादाच्या यादीतील जगात मोठे नाव आहे. १९८० च्या दशकात दाऊदने एक संघटित गुन्हेगारी संघटना स्थापन केली, ज्याला मीडियाने डी-कंपनी असे नाव दिले.अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम हा अनेक देशांच्या सरकारांसाठी वर्षानुवर्षे गूढच राहिला आहे. दाऊद १९९३ च्या मुंबई बॉमबस्फोटातील तो एक म्होरक्या आहे.दाऊद भारतासाठी मोस्ट वॉन्टेड आहे .मात्र भारत सरकारसाठी एक गूढच आहे, ज्याच्या शोधात बड्या एजन्सी वर्षानुवर्षे काम करत आहेत, पण आजतागायत त्याचा सुगावा लागलेला नाही.**

पाकिस्तानी क्रिकेटपटू जावेद मियांदादच्या संगतीमुळे दाऊद इब्राहिमला तेथे प्रोत्साहन मिळत असल्याचे जाणकारांचे मत आहे. तो वर्षानुवर्षे पाकिस्तानात राहिला, पण त्याला कधीच पकडता आले नाही. जागतिक दहशतवादी घोषित होऊनही अद्याप कोणत्याही देशाच्या सरकारचे हात त्याच्या मानेपर्यंत पोहोचू शकलेले नाहीत, यावरून दाऊदच्या प्रभावाचा अंदाज लावता येतो. दाऊद भारत सरकारसाठी मोस्ट वॉन्टेड कसा बनला पण अजून पर्यंत भारताच्या हाती लागलेला नाही.

खरं तर, १२मार्च १९९३ रोजी मुंबईत सीरियल बॉम्बस्फोट झाले होते, ज्यामध्ये अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम दोषी आढळला होता. या दहशतवादी घटनेत १३ बॉम्बस्फोट झाले, ज्यात ३५० लोकांचा मृत्यू झाला, तर १२०० हून अधिक लोक जखमी झाले होते.

या घटनेनंतर दाऊद भारत सरकारसाठी मोस्ट वाँटेड गुन्हेगार ठरला. दाऊदच्या मुसक्या आवळत सरकारने २००३ मध्ये दाऊदला जागतिक दहशतवादी घोषित केले होते. यानंतर २०११ मध्ये फोर्ब्स मासिकाने जाहीर केलेल्या जगातील मोस्ट वॉन्टेड टॉप-१० गुन्हेगारांच्या यादीत दाऊद पहिल्या क्रमांकावर होता. यापूर्वी २००८ मध्ये, फोर्ब्सच्या जगातील सर्वाधिक वाँटेड टॉप-१० गुन्हेगारांच्या यादीत तो चौथ्या क्रमांकावर होता. याशिवाय काही मीडिया रिपोर्ट्समध्ये दाऊदचा २००८ मध्ये २६/११ च्या हल्ल्यात हात असल्याचेही सांगण्यात आले होते.

दाऊद इब्राहिम हा हवालदाराचा मुलगा असून तो शहरातील डोंगरी भागात लहानाचा मोठा झाला आहे. १९८० च्या दशकात दाऊद मुंबईत सुरू असलेल्या टोळीयुद्धाचा एक भाग बनला आणि त्यासाठी तो हाजी मस्तान टोळीत सामील झाला, मात्र काही दिवसांनी दाऊदचे हाजी मस्तानशी वैर निर्माण झाले, त्यामुळे दाऊद त्याच्या काही साथीदारांसह निघून गेला. हाजी मस्तान टोळी वेगळी झाली. पठाण टोळी आणि हाजी टोळीशी लढल्यानंतर दाऊद अधिक शक्तिशाली झाला. मुंबईत लोक दाऊदला घाबरू लागले. पठाण टोळीशी संबंधित बहुतेक लोक अफगाणिस्तानातून स्थलांतरित होते. दाऊदच्या भावाची पठाण टोळीने हत्या केली, त्यानंतर दाऊदने शहरातील पठाण टोळीचा बदला घेण्याचे ठरवले, दाऊदने हाजी टोळीतील सर्व सदस्यांची हत्या केली, त्यानंतर हाजी राजकारणात आला आणि दाऊद अंडरवर्ल्ड गुन्हेगार बनला. १९८० च्या दशकात दाऊदने एक संघटित गुन्हेगारी संघटना स्थापन केली ज्याचे नाव मीडियाने डी कंपनी ठेवले. डी-कंपनी ही दक्षिण आशियातील सर्वात मोठी भूमिगत व्यवसाय संस्था मानली जाते, ज्याद्वारे खंडणी, सुपारी किलर, शस्त्रास्त्रांची तस्करी, अंमली पदार्थांची तस्करी आणि दहशतवादी कारवाया केल्या जातात.

गुन्हेगारी कारवायांव्यतिरिक्त दाऊदचा मोठा व्यवसाय क्रिकेटमध्ये सट्टेबाजी आणि मॅच फिक्सिंगचा होता. १९८५ मध्ये दुबईत झालेल्या क्रिकेट सामन्यांदरम्यान दाऊद स्टेडियममध्ये बसलेला दिसला होता. याशिवाय दाऊदने बॉलिवूडमध्येही हात आजमावला आहे. रिपोर्टनुसार दाऊद दुसऱ्याच्या नावावर चित्रपटांमध्ये पैसे गुंतवत असे. 'चोरी चोरी' ' चुपके चुपके' हा डी-कंपनीच्या पैशातून बनलेला चित्रपट आहे. असं बोलल्या जाते.



दाऊद पाकिस्तानमध्ये दडून असल्याच्या बातम्या नेहमीच येतात.पण तो अजूनही भारताच्या हाती लागलेला नाही. विजय मल्ल्याला लंडनमध्ये अटक करण्यात आली होती, पण देशाचा खरा शत्रू दाऊद इब्राहिम पाकिस्तानात सुरक्षित बसला आहे. ब्रिटीश सरकारसह भारताने मल्ल्याला अटक केली, पण ज्याच्या प्रतीक्षेत भारताचे लाखो डोळे आहेत त्याचे काय? होय, तो भारताचा मोस्ट वॉन्टेड दाऊद इब्राहिम आहे. अजून पर्यंत दाऊद भारताच्या हाती लागला नाही. जगात असे अनेक कायदे आहेत, ज्याद्वारे एखाद्या देशाचा गुन्हेगार पकडला जाऊ शकतो, पण जेव्हा पाकिस्तानचा प्रश्न येतो तेव्हा तो हतबल होतो. कारण तिथे दहशतवादाचे जाळे पसरले आहे आणि त्यामुळे त्यांनी स्वतःच कायदेशीर व्यवस्थेला अडकवले आहे. दाऊदला पकडण्यासाठी भारताने अनेकवेळा पाकिस्तानचा आधार घेण्याचा प्रयत्न केला आहे. पण, प्रत्येक वेळी अपयश आले. पाकिस्तानात मोस्ट वॉन्टेड दहशतवाद्यांची फौज आहे. पाकिस्तानात घुसून अमेरिकेने ठार मारलेल्या ओसामा बिन लादेनबद्दल बोलूया. एवढेच नाही तर मुंबई २६/११चा मास्टरमाइंड हाफिज सईदचा तळही पाकिस्तानात आहे. जिथे तो भारतविरोधी घोषणा देऊन लोकांना भडकवतो. भारताचा सर्वात मोठा शत्रू दाऊद इब्राहिमही पाकिस्तानात लपला आहे. एवढेच नाही तर अशा अनेक संघटना पाकिस्तानात पाय रोवून बसल्या आहेत. तेहरीक-ए-तालिबान, लष्कर-ए-झांगवी, सिपाह-ए-साहाबा, लष्कर-ए-तैयबा आणि बरेच काही.

दाऊदच्या अटकेचे आव्हान कायम आहे.

गेल्या कित्येक वर्षांपासून भारतातील सर्व सरकारे दाऊदला भारतात आणण्याबाबत बोलत आहेत. मात्र आजपर्यंत दाऊद इब्राहिमला भारतात आणण्यात कोणत्याही सरकारला यश आलेले नाही. तज्ज्ञांच्या मते, गेल्या ३० वर्षांत भारताच्या तपास यंत्रणांना दाऊदचा बदललेला चेहराही शोधता आलेला नाही. नरेंद्र मोदी सरकार येऊन जवळपास ९ वर्षे झाली आहेत. मोदी सरकारही दाऊदला आणण्याबाबत बोलत आहे. गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी ११ मे २०१५ रोजी लोकसभेत एक विधान केले होते, ज्यात त्यांनी म्हटले होते की भारत सरकार कोणत्याही किंमतीत दाऊदला परत आणेल.

दाऊदशी संबंधित प्रत्येक माहिती पाकिस्तानला देण्यात आल्याचे राजनाथ सिंह यांनी लोकसभेत दिलेल्या निवेदनात म्हटले होते.पाकिस्तानला आता कारवाई करावी लागेल. गरज पडल्यास याप्रकरणी पाकिस्तानशीही चर्चा केली जाईल. पण पाकिस्तानने दाखवलेली वृत्ती पाहून असे दिसते की, त्याला भारताला कोणत्याही प्रकारे मदत करायची नाही आणि दाऊदला पाहुणे म्हणून ठेवायचे आहे.

भारताला इच्छा असूनही अंडरवर्ल्ड डॉन दाऊदला पकडता येत नाही कारण पाकिस्तान दाऊदला भारताकडे सोपवू इच्छित नाही. पाकिस्तानला या प्रकरणात हस्तक्षेप करायचा नाही. दाऊद भारतात सापडेल हे त्याला माहीत आहे आणि दाऊद पाकिस्तानात नाही असे पाकिस्तानने अनेकदा म्हंटले पण पाकिस्तानचा हा दावा सपशेल खोटा ठरलेला आहे. अशा परिस्थितीत भारतासमोर एकच पर्याय उरतो, तो म्हणजे दाऊदचा खात्मा करणे... जसे अमेरिकेने पाकिस्तानात घुसून ओसामाला ठार केले. पण दौउदला पाकिस्तानी लष्कराची मदत आहे.

# कुस्तीतील धर्म आणि अधर्म !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र हा कुस्तीगीरांचा प्रदेश ! कोल्हापूरच्या लाल मातीने अनेक कुस्तीगीर घडवले. देशासाठी पाहिले व्यक्तिगत ऑलिंपिक पदक मिळवून देणारे खाशाबा जाधव हे याच लाल मातीतले. सतपाल सिंगचा उदय झाला आणि हळू हळू कुस्तीचा केंद्रबिंदू दिल्ली, हरियाणा कडे झुकला. मातीतून mat वर कुस्ती आली ते एक वेगळे आव्हान निर्माण झाले. दादू चौगुले , युवराज , गणपतराव , हरिश्चंद्र बिराजदार , चंबा मुटनाल अशी उज्वल परंपरा असलेले कुस्ती क्षेत्राला अलीकडे राजकीय ग्रहण लागलेले दिसते पण आता त्यात भर म्हणून जे धर्मिक ग्रहण येऊ पाहत आहे ते ज्यास्त भयानक आहे .**

हिंद केसरी , महाराष्ट्र केसरी या कुस्तीच्या विश्वातील महत्वाच्या स्पर्धा ! तो बहुमान मिळणे म्हणजे कुस्तीगीरांचा तालमीचा एका अर्थाने सन्मान ! नुकताच झालेल्या महाराष्ट्र केसरीमध्ये शिवराज राक्षे याला तो बहुमान प्राप्त झाला त्याचे अभिनंदन !

त्याच्या या बहुमानाला सरळ मान्य करायचे नाही असे काही मंडळींनी ठरवले आहे असे दिसते ! त्यामुळे सिकंदर या पैहलवानाचा झालेला उपांत्य फेरीतील पराभवाचा वाद उकरून काढत त्याला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न केला जात आहे .

सुदैवाने धर्मेंद्र याने टाकलेला डाव आणि सिकंदरची टेकलेली पाठ ही व्हिडीओत स्पष्ट दिसत असताना पंचांना दोषी ठरवायचे त्यांना धमक्या द्यायच्या ही शुद्ध गुंडगिरी आहे आणि हे कुणाच्या आशीर्वादाने चालले आहे हे जनतेला न कळण्याइतकी जनता मूर्ख नाही ! पुढील निवडणुकीत सिकंदर एका विशिष्ट राजकीय पक्षाचा उमेदवार असला तर नवल वाटणार नाही ! काही ठराविक लोकांनी महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रे ही जातीय , धार्मिक भेद निर्माण करून नासवायची ठरवली आहेत असे दिसते . हे तेच लोक आहेत ज्यांना सरस्वती वंदना नको आहे , हे तेच लोक आहेत ज्यांनी संभाजी राजे याना धर्मवीर म्हणण्याचे नाकारले आहे , हे तेच लोक आहेत ज्यांना शूर्पणखा ग्रामदैवत वाटते , ज्यांना प्रत्येक क्षेत्रात धार्मिक रंग आणून त्या क्षेत्राचा राजकारणासाठी वापरायचे आहे . साहित्य , नाट्य क्षेत्र याला यांनी अपवाद ठेवलेले नाही . या मंडळींच्या मदतीला काही चाटुकार पत्रकार पण आहेत . पत्रकारिता आणि शिक्षण क्षेत्रात ही बजबजपुरी वाढली आहे . आश्चर्य हे वाटते की एरवी राजकारणात कट्टर विरोधक असणारे पण एकमेकांच्या सहकार्याने पदे लाटण्यात अग्रेसर आहेत . त्यांचा पण निषेधच केला पाहिजे . नुकतीच निवड झालेले MCA चे अध्यक्ष हा याचा पुरावा म्हणावा लागेल ! कुस्ती , कबड्डी , क्रिकेट या मंडळींची खानदानी जहागिरदारी झाली आहे. यांचेच अनुयायी भ्रष्ट्राचार करतात आणि कारवाई सुरू झाली की धर्माचा आश्रय घेतात आणि उर बडवून घेतात ! अतिरेक्यांना धर्म नसतो हे त्यांचे तत्वज्ञान आहे पण अतिरेक्यांशी आर्थिक व्यवहार केले म्हणून कारवाई झाली की धार्मिक ओकाऱ्या काढून उपोषणाला



बसणारे हेच आहेत ! राजकीय सत्तेच्या खेळासाठी समाज जीवन नासवण्यासाठी आता त्यांनी कुस्ती हे माध्यम निवडले आहे . एक सुंदर पारंपरिक भारतीय मर्दानी कुस्तीच्या खेळात धर्म आणून अधर्म करण्याचे पाप ही मंडळी करत आहेत ! वास्तविक आधुनिक कुस्ती च्या खेळात पदके मिळवण्यासाठी आपण कुठे कमी पडतो त्यासाठी तंत्रज्ञान काय वापरायचे ,प्रशिक्षक कसे असावे ? सुविधा कुठल्या पुरवायच्या याचा विचार करण्या ऐवजी गुंडगिरी आणि पुंडगिरी निर्माण करून त्याचा राजकारणासाठी कसा उपयोग करायचा याचा विचार करणाऱ्या राजकारण्यांना क्रीडा क्षेत्रातून हद्दपार करणे हाच एकमेव मार्ग क्रीडाक्षेत्र सुधारण्याचा असू शकतो मग कुठलाही पक्ष , कुठलाही नेता याला अपवाद नाही. क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास करून देशाला त्यात पुढे नेणे आणि क्रीडा हे राष्ट्र आराधनेचे माध्यम बनवणे हाच खरा धर्म आहे . खेळाडूंचा धर्म शोधणे हा निव्वळ अधर्म आहे आणि असा अधर्म करणारे त्यांना सोयीसाठी पाठिंबा देणारे अशांचा जितका निषेध करू तेव्हढा थोडा आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# "उपेक्षितांचं जग..."



डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

आधुनिक केसरी

**मित्रांनो..! आपल्या अवतीभवती उपेक्षितांचं फार मोठं जग आहे. त्या उपेक्षितांच्या जगाकडे आपण नेहमीच कानाडोळा करत आलो आहोत. जणू आपल्याला त्या घटकाशी काही देणंघेणं नाही, अशा अविर्भावात आपण वावरत असतो. उपेक्षितांची वेदना, त्यांचे जटिल होऊन बसलेले मूलभूत प्रश्न आणि त्यांचा जगण्याचा संघर्ष हा "जावे त्यांच्या वंशा, तेव्हा कळे.!" २६ जानेवारी जवळ येतीय.. भारतीय स्वातंत्र्याचा जयघोष चालू होईल....उघड्या नागड्या आदिवासींच्या, पाल ठोकून राहणाऱ्या उपेक्षितांच्या मनात पुन्हा स्वातंत्र्याचे, मानवी हक्कांचे, जगण्याचे, संघर्षाचे.. प्रश्न मनातल्या मनात घोळू लागतील आणि लगेच विरघळूनही जातील बर्फासारसे..!**

औरंगाबादसारख्याच अनेक शहराच्या उड्डाण पुलाखाली ह्या निराधार उपेक्षितांचा भातुकलीचा संसार मांडलेला असतो. त्यांच्याकडे बघितले की, वाटते या उपेक्षितांपर्यंत १९४७ च्या स्वातंत्र्याची वार्ता अजून गेलीच नाही की काय..? आणि ज्या पुलाखाली त्यांनी संसार मांडलाय त्याच उड्डाण पुलाला नाव दिलेलं आहे "स्वातंत्र्यवीर सावरकर उड्डाण पूल" पुलाखाली बाजुलाच पुतळा होऊन हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक साहेब हे या उपेक्षितांचा भातुकलीचा संसार पहात उभे आहेत, कित्येक वर्षापासून..! त्यांनाही वाटत असेल, हल्लीच्या सत्ताधाऱ्यांनी या बेघर असणाऱ्या पुलाखालच्या माणसांना आधुनिक जगाच्या प्रवाहात आणलं पाहिजे.. परंतु.. छे.! ते निवडणूकीच्या मतदानासाठी बाहेर देशातून विमानाने खर्च करून आणतील; परंतु अशा उपेक्षितांना आधुनिक जगाच्या मुख्य प्रवाहात आणणार नाहीत.

सिडको कॉर्नरला सिग्नलजवळ येणाऱ्या जाणाऱ्या मोटार गाड्यांच्या गर्दीतून पादचारी कसाबसा रस्ता काढत पुढे पुढ जात असतो...हे पुलाखालचं उपेक्षितांचं जग या चंगळवादी उद्विग्न जगाकडे टुकूटुकू बघत आपल्या संसाराचा एकेक दिवस ढकलत असते उपाशी-तापाशी. काही वंचित, पीडित, निराधार कुटुंब हे शहरातील अडगळीत पडलेल्या सिमेंटच्या मोठ्या पाईपमध्येही आपला संसार थटवतात. त्यांना ऊन, वारा, पाऊस, थंडी कशाचीच पर्वा नसते...काही कुटुंबाचा संसार तर रस्त्याच्या कडेला उघड्यावर उभा केलेला असतो. तिथे सुरू असतो त्यांचा लहान मुलांना क्रिकेटच्या बॅट करून विकण्याचा पोटभरु धंदा.... वास्तविक पाहता क्रिकेटच्या जगाचा आणि त्यांचा काहीच संबंध नसतो....एकाला एक बॅट तयार करुन विकल्यावर पाच-पंचवीस रुपये कमवून देते, तर तीच बॅट क्रिकेटपटूंना कोटी रुपये कमवून देते...पंचवीस रुपये आणि कोट्यावधी रुपये यामध्ये कमालीची तफावत असते... मग "सबका साथ सबका विकास" कसा शक्य असेल..? उड्डाण पुलाखाली राहणाऱ्यांनी कसा आणि कुठे लावावा "हर घर तिरंगा?" ज्या उपेक्षितांना घरकुलाची गरज आहे त्यांना कसे मिळतील घरकुलं.. त्यांच्याजवळ घरकुलासाठी लागणारे आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक आणि रहिवाशी प्रमाणपत्रच नसते...कारण पुलाखाली राहणाऱ्या कुटुंबाला गावच नसते...जिथं भरला दरा, तोच गाव खरा" जिथं पोट भरेल तिथेच रहायचं.. कायमचे बस्तान कुठेच नसेल तर कुठून मिळणार त्यांना रहिवासी प्रमाणपत्र..? कुठून मिळणार आधार कार्ड..? जर कोणतेच दाखले मिळणार नसतील तर....पुलाखाली व पालावर राहणारा माणूस या देशाचा नागरिक गणला जाईल का? तो जर एखाद्या राज्याचा नागरिकच नसेल तर तो भारतीय नागरिक म्हणून मुख्य प्रवाहात कसा येईल..? त्याचे मूलभूत हक्काचे प्रश्न कसे सुटतील.? त्याला कोणत्या कोर्टात न्याय मिळेल ?

"सबका साथ सबका विकास"च्या योजनेत पुलाखालच्या माणसांचे कधी येतील अच्छे दिन..?" पाच सहा वर्षापूर्वी "काला पैसा लायेंगे, "अच्छे दिन आयेंगे" चा बोलबाला सुरू होता.. नंतर "अच्छे दिन"ची तरुण मुले खिल्ली उडवू लागले...एका खेड्यातल्या चाळीत पत्राच्या पडक्या घरात राहणाऱ्या एका निराधार म्हातारीला ही दोनचार टवाळखोर मुले तिच्या घराजवळ जाऊन पुनः पुन्हा चिडवत म्हणायची "आच्छे दिन कधी येनार हे " ती म्हणायची "जाय ना भाड्या.!" हा व्हिडिओच खूप व्हायरल झाला होता... त्या म्हातारीच्या त्या बोलण्यावर ती मुले फिदी फिदी हसायची आणि पुन्हा तेच तेच वाक्य बोलून म्हातारीची शिवी खायचे. मला वाटतं ती शिवी त्या मुलांना लागत नसावी...असो. लागो कोणालाही..! मला वाटतंय तिला माहित होतं की काय, कोण जाणे..अच्छे दिन वगैरे काही नसतं... ती एक अंधश्रद्धा असते म्हणून.! उपेक्षितांच्या जगाची ओळख करून घेणाऱ्या माणसांना असते त्यांची सहानुभूती आणि त्यांच्या विद्रूप जीवनाची अनुभूती...

एके दिवशी सकाळीच भारत बाजारमधून ए.पी. आय.कॉर्नरजवळून फिरण्यासाठी पूर्वेला निघालो. काही अंतरावर नर्सरीचे दुकान, त्याच्या अलिकडे देवाच्या मूर्ती तयार करून विकणाराची मेनकापडाची खोपी. त्या खोपीसमोर अनेक तऱ्हेच्या वेगवेगळ्या आकाराच्या मूर्त्या. त्यावर खूप धूळ साचलेली. अनेक वेळा बघितल्या तरी त्या जेवढ्याला तेवढ्याच दिसत असायच्या. म्हणजे त्या विकत होत्या किंवा नाही याबाबत तर मला शंकाच येत असायची. खरेतर ते एक कलावंत, उत्कृष्ट शिल्पकार असूनही कित्येक वर्षापासून रस्त्याच्या कडेला खोपीसमोर मूर्ती तयार करून ठेवतात आणि ग्राहकांची वाट पाहत बसतात..हे वाट्याला




आलेलं दैन्य, दारिद्र्य हे त्या बिचाऱ्या मूर्त्या कशा संपवणार ? हे त्या कलाकाराला माहितच असते; कारण जाणून बुजून दगडाच्या मूर्त्याच त्या.! कसला चमत्कार नि कसलं काय..? देवमूर्त्या विकल्या तरच चार पैसे मिळणार नि पोटाची खळगी भरणार..! नाहीतर दैन्य, दारिद्र्य आहेच पाचवीला पुजलेलं..!

बरे उपेक्षितांची ही दयनीय अवस्था सरकारच्या लक्षात का येऊ नये? अशा कलावंतांची दखल घेऊन त्यांच्या कलेला योग्य जागा, योग्य मानधन देऊन त्यांचं पुनर्वसन का करण्यात येऊ नये? क्रिकेट प्लेअर तयार होतील, राजकारणी तयार होतील, नट,नट्यां तयार होतील ;परंतु कलावंतांना कला ही निसर्गतःच मिळालेली देणगी असते. कलावंत हा देशाची सांस्कृतिक ओळख असतो.. म्हणून शासनाने शास्त्रज्ञ, कवी, लेखक, चित्रकार, विचारवंत, कलावंत, शिल्पकार यांची हेळसांड न करता देता त्यांना जपले पाहिजे. त्यांना वेळोवेळी प्रोत्साहन दिले पाहिजे. हे सरकारचे आद्यकर्तव्यच आहे.!
एका म्हाताऱ्याने तर सरकारचा उद्धारच केला.

परवा पुणे गाडीतून उतरताना एका वयस्कर म्हाताऱ्याला मदत केली...आणि उतरल्यावर म्हणालो, "बाबा आता दबलंचोपलं घरीच राह्यलं पाहिजे." "आरं बाबू गाडी फुकटाची हाय मून पोरानं पाठीलं नातीकडं " म्हातारं खोकलंत खोकलंत बोललं. मी लगेच म्हणालो,"बाबा आता पुढच्या महिन्यात लॉकडाऊन लागणार हे, जास्त गावं फिरू नका." माझं बोलणं संपायच्या आतच म्हाताऱ्याने तोंडातल्या तोंडात एक शिवी हासडली नि म्हणालं,"हे सरकार आजून करुना आन्तय का काय रे बाबू..?"

मला वाटलं मी जर हो म्हटलं तर म्हातारं सरकारला पुन्हा एखादी शिवी देईल म्हणून मी लगेच म्हणालो,"येतो बाबा." आणि पेपर घेऊन घराकडे निघालो..! अलिकडं असं वाटू लागलं की, आपलं लिहिण्या, बोलण्याचं स्वातंत्र्यच हिरावून घेतलंय की,काय ? एवढं सेन्सेटीव्ह वातावरण होऊन बसलंय. राजकारणातल्या कोणत्या माणसाच्या बाजुने बोलावं अन् कोणत्या माणसाच्या बाजुने बोलू नये ?
मोठा पेच निर्माण झालाय.!
चला,.. हेही दिवस निघून जातील..!

**लेखक - सामाजिक, साहित्यिक,सांस्कृतिक चळवळीचे अभ्यासक आहेत.**

# धर्मग्रंथावर चर्चा होते, संविधानावर का नाही ?




विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारत हा सर्वगुणसंपन्न असताना ही मागासलेला असल्याचे एकमेव कारण म्हणजे धार्मिकता. भारत हा एवढा धर्मांध देश आहे की धर्माच्या नावावर येथे विषमता, अंधविश्वास, अन्याय, अत्याचार सर्व काही खपवून घेतले जाते. आणि विशेष म्हणजे धर्मनिरपेक्षतेची शपत घेतलेली सत्ताधारी त्याला खतपाणी घालण्याचा प्रयत्न करतात. भारतीय इतिहास बघितला तर हा इतिहास विषमता, पाखंड, अंधविश्वास, भेदभाव यावर आधारलेला होता. मनुस्मृती सारख्या ग्रंथानी तर्क, विज्ञानाच्या पलिकडे जाऊन समाजामध्ये विषमता, भेदभाव कायम राहील अशाप्रकारची शिकवण दिली आणि संविधान लागु होण्याआधी विषमतेवर आधारीत, भेदभाव व वर्णभेद करणारा धर्मग्रंथ म्हणून मान्यता होती परंतु संविधाना नंतर जुने सर्व कायदे रद्द करण्यात आले.**

इतिहासातील ग्रंथ व व्यवस्था यांनी अनेक अन्याय अत्याचार लोकांना हीन, निच आणि तुच्छ समजून देशातील लोकांवर केले. परंतु संविधानाची अंमलबजावणी झाली आणि देशातील प्रत्येक नागरिकांना माणुस म्हणून ओळख दिली आणि अन्याय अत्याचारा विरोधात संविधानीक संरक्षण दिले. भारतात आजही विषमता, भेदभाव डोक्यातून गेला नाही. याची अनेक उदाहरणे आहेत. सर्वात महत्वाचे उदाहरण म्हणजे आपला देश धर्मनिरपेक्ष आहे, धर्मनिरपेक्ष पणे काम करेल अशी देवाची शपथ घेऊन सुद्धा धार्मिकतेला वाव देतात. संविधाना नुसार काम करण्याची शपथ घेऊन संविधान विरोधी काम करतात, धार्मिक कट्टरतेला प्रोत्साहन दिले जाते आणि विषमता कायम ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. आजही इतर जाती धर्म याबाबत प्रचंड तिरस्कार व घ्रना समाजामध्ये बघायला मिळते. एवढी विषमता आणि भेदभाव आहे की देशाचे संविधान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून काही लोक वाचत सुद्धां नाहीत एवढा द्वेष करतात. कारण त्यांना संविधान एकाच जातीसाठी बनवले आहे असे वाटतं. यासंदर्भात सरकारने कधी जागृती केली नाही मिडीयाने कधी संविधानावर चर्चा घडवून आणली नाही. उलट इलेक्ट्रॉनिक्स मिडिया समाजामध्ये द्वेष पसरवण्याचे काम करत आहे हे न्यायालयाला सांगावे लागले. म्हणजे इलेक्ट्रॉनिक्स मिडीयाने किती अतिरेक केला असेल याची जाणीव होते. भारतीय संविधानाने प्रत्येकाला प्रत्येक धर्माचे आचरण करण्याचा पुर्ण अधिकार दिला आहे. देशातील कोणत्याही धर्माचा व्यक्ती त्याच्या धर्माची उपासना आचरण करू शकतो. परंतु देशाच्या कामकाजावर, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यावर कोणत्याही धर्माचा प्रभाव राहणार नाही. थोडक्यात काय धर्म ही वैयक्तिक बाब असेल त्याचे आचरण किंवा प्रभाव हा घरामध्ये पाहिजे घराच्या चौकटीच्या बाहेर प्रत्येक जन भारतीय आहे आणि त्यांच्या राष्ट्रीय ग्रंथ हा भारतीय संविधान आहे. संविधान हे सर्वोच्च असते. त्याचा मानसन्मान करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. संविधान साक्षर लोक पाहिजे जे ने करून राज्यकर्ते संविधानाला अनुसरून काम करतात की नाही यावर लक्ष ठेवता येते. परंतु येथे परिस्थिती उलट आहे. बऱ्याच लोकांना जुन्या विषमता पसरवणाऱ्या पुस्तकील संस्कृत मधले श्लोक पाठ आहेत परंतु भारतीय संविधानाचे कलमे माहिती नाहीत ही शोकांतिका आहे. आणि याचा दुसरा अर्थ असा आहे लोकांना धर्मनिरपेक्ष लोकशाही मान्य नाही तर यांना धार्मिक राज्य पाहिजे. एक माणुसकी ची शिकवण आहे आणि ही शिकवण प्रत्येक धर्मात आहे ती म्हणजे माणसाने माणसासोबत माणुसकी ने वागले पाहिजे या पेक्षा मोठा धर्म कोणताही नाही. बर माणसाला आदर्श जिवन जगण्यासाठी धर्म असतो. म्हणजे धर्म नियमाच्या अधिन राहून येथे योग्य मार्गाने जिवन जगता यावे या साठी धर्म






असतो. परंतु देशात धर्माच्या नावाने स्वैराचार सुरु आहे. दुसऱ्या धर्मावर दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तर्क विज्ञान आणि सत्य सोडून फक्त कल्पना, काल्पनिक गोष्टींवर वेळ पैसा खर्च करण्यात भारत अग्रेसर आहे.

देशातील नागरिकांचे प्रश्न, वाद मिटवून शातंता व सुव्यवस्था निर्माण करण्याचे काम सरकारचे असते परंतु देशात धार्मिक वादात सरकारच सहभागी असल्याने देशात शांतता आणि सुव्यवस्था कुणी प्रस्थापित करायची? देशात स्वैराचाराला सरकारने प्रोत्साहन देणे कितपत योग्य आहे? सरकारने जनतेचे असायला पाहिजे येथे अनेक लहान मोठ्या धर्माचे लोक राहतात आणि सत्तेतील जबाबदार लोक पदावर असताना धार्मिक विषयांवर बोलून धर्मांधतेचे उदाहरण देतात. जगातील आदर्श लोकशाही चुकिच्या लोकांच्या हाती गेल्याने जनतेला लोकशाही चे फळ पाहिजे तसे चाखता येईना. बर धर्माचे नाव काढले तर लोकांचा मेंदु काम करत नाही, सत्य काय हे समजत नाही, धर्माच्या नावाखाली कोणतेही कृत्य करताना आपले चुकिचे संस्कार दिसतात याची




चिंता नसुन माझाच धर्म श्रेष्ठ कसा यावर भर देऊन माणसाला माणसापासून तोडले जाते. पाकिस्तान हे धार्मिक राष्ट्र आहे तेथे आज लोकांची परिस्थिती काय आहे हे सर्वांना परिचित आहे.उपासमारीने लोक मरत आहेत. आणि आपण धर्मावरच वेळ खर्च करत आहेत. संविधान समजून घेऊन देशाचा विकास कसा साध्य होईल यावर लोकांचे लक्ष नाही कारण येथील प्रस्थापितांना समतावादी, न्यायवादी संविधान सुरवातीपासुनच मान्य नाही म्हणून यांनी जाणीव पुर्वक संविधानावर बोलणे , चर्चा करणे टाळले म्हणून आजही देशातील जनतेला संविधाना विषयी आपुलकी, प्रेम व सन्मान पाहिजे तसा निर्माण झाला नाही याचे महत्त्वाचे कारण डोक्यात असलेली धार्मिक विषमता. आणि म्हणून सरकार आणि सरकारच्या इशाऱ्यावर चालणारा मिडिया विषमता वादी ग्रंथातील एखाद्या वादग्रस्त कालबाह्य आणि चुकिच्या शब्दांवर चर्चा करतात पण देशाच्या आणि सर्वाच्या संविधानावर चर्चा केली जात नाही यावरून सरकार, धार्मिक जनता आणि मिडीयाचा दुटप्पी पणा दिसून येतो.

लोकशाही आणि संविधान टिकवून समाजामध्ये रुजवायचे असेल तर त्यावर चर्चा होणे ते जनतेला समजून सांगणे आवश्यक आहे. मग सरकार हे काम करत नाही मिडिया हे काम करत नाही तर हे काम करायचे कोणी हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न येतो. सुरवातीपासुनच संविधान, सामाजिक समस्येवर आंदोलन, सामाजिक लढा याची जबाबदारी आंबेडकरवादी लोकांवर आलेली आहे. परंतु संविधानाबाबत एख गोष्ट अशी ही आहे काही स्वतः ला आंबेडकरवादी समजणाऱ्या लोकांनी संविधान डोक्यावर घेतले डोक्यात घेतले नाही म्हणून त्यांना ही संविधान कळाले नाही, परंतु कोणी त्याला सांगितले तर संविधानाच्या विरोधात हे अस झाले तस झाले तर त्याचे रक्त खळबळून उठते परंतु संविधान डोक्यात नसल्याने रोज संविधानाच्या विरोधात होत असलेल्या कामाची त्याला जाणीव नसते. म्हणून संविधाना विषयी जनजागृती चर्चा आज काळाची गरज आहे. आज स्वतः ला आंबेडकरवादी समजणारे संविधानाला डोक्यावर घेणाऱ्या लोकांना जर संविधाना विषयी जागृती नसेल तर यापेक्षा जास्त दुःख कोणतेच नाही. धार्मिक लोक विषमता, तिरस्कार असलेले विचार चांगले कसे आहेत हे पटवून देतात परंतु भारतीय संविधान हे देशाचे कसे आहे, त्यातून मानवाचे कल्याण कसे होते हे पटवून देण्यात आंबेडकरवादी जनता कमी पडली आहे हे नाकारता येणार नाही. जर आम्हाला संविधानाची पेरणी समाजात देशात करायची असेल तर अगोदरच आंबेडकरवादी लोकांनी समजून घेऊन ते लोकांना समजून सांगावे. आजही आम्ही जर समतावादी आणि देशाच्या हिताचे संविधान भारतीय नागरिकांना समजून सांगू शकलो नाही तर धर्मांध लोकांचे विषमतावादी विचार रोजच ऐकायला मिळतील आणि यातून देशात अराजकता निर्माण होऊन शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. एक गोष्ट पक्की लक्षात ठेवणे आवश्यक आहे सरकार आणि मिडिया धर्मांध होऊन लोकशाही विरोधात काम करण्याचा अजेंडा राबवत आहेत. म्हणून ते संविधानावर चर्चा करत नाहीत किंवा घडवून आणत नाहीत. म्हणून आता संविधान व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी घोषणा कमी आणि संविधान जनजागृती करणे आवश्यक आहे. आजही कोणाला वाटत असेल तर संविधान कोणी बदलू शकत नाही किंवा संविधानानेच देश चालतो तर हा चुकीचा भ्रम आहे. अनेक कृत्य, शब्द हे संविधान विरोधी वापरले जात आहेत आणि नागरिकांना त्याची जाणीव ही नाही. स्वतः ला आंबेडकरवादी समजणारे नेते तर स्वार्थासाठी एवढे लाचार झाले एकिकरण सोडून संविधान विरोधी लोकांसोबत हात मिळवणी करून तेही त्यांना च सहकार्य करत आहेत मगग सरकार आणि मिडिया ला संविधान जागृती करण्याची काय गरज. सर्व आंबेडकरवादी अनुयायी एकत्र येऊन संविधान जागृती करून सरकार वर दबाव आणला तर मग संविधानावर चर्चा होईल. त्या साठी वैचारिक एकतेची गरज आहे.

# साप हा शेतकऱ्यांचा मित्र



सागर सोनवणे
परभणी

आधुनिक केसरी

**आपल्या देशात दरवर्षी जेवढे धान्य पिकवले जाते, त्यापैकी २५ ते ३० टक्के धान्य उंदीर नष्ट करतात. आपण उंदीर मारण्यासाठी जी साधने वापरतो ती अती वापरामुळे नंतर परिणामकारक ठरत नाहीत. कारण सुरुवातीला त्या औषधाने उंदीर मरतात, पण त्या औषधाच्या अती वापरामुळे उंदीरांची पुढची पिढी त्या औषधाला प्रतिकार करण्याची जनुकीय शक्ती घेऊनच जन्माला येते. त्यामूळे उंदरांवर ताबा मिळवण्यासाठी शेवटी साप हेच एक नैसर्गिक साधन उरते. शिवाय साप हे उंदरांच्या थेट बिळात शिरुन त्याला मारु शकतात. सापांबद्दल अंधश्रद्धा आणि गैरसमजूती दुर करण्याचा एक प्रयत्न आहे. सर्पदंशाच्या 88 टक्के घटना ग्रामीण भागात होतात. यात बहुतेकजण शेतकरी करी असतात.**

**सापांची संख्या कमी होण्यामागची कारणे :-**
1. मनुष्य जंगलावर करत असलेले अतिक्रमण आणि जंगलतोड.
2. महामार्गाची आणि वाहनाची संख्या वाढल्याने दरवर्षी फक्त महाराष्ट्रातच 5 लाखांपेक्षा अधिक साप रस्त्यावर मृत्युमुखी पडतात. 3. मानवी वस्तीमध्ये आलेल्या सापांची भीती व अंधश्रध्दे पोटी होणारी हत्या.
4. प्रदूषणामुळे वातावरणात व पाण्यात होणारे बदल. 5. सापांची अंधश्रध्देतून होणारी तस्करी व हत्या.6. कीटकनाशकांमूळे सुध्दा सापांची संख्या कमी होत चालली आहे...

**उंदरांपासून होणारी नासाडी :-** एका साप (जीवनकाळात) सुमारे सव्वा पाच ते साडे पाच लाख उंदरांवर नियंत्रण ठेवतो. एका उंदराची जोडी वर्षाला सरासरी 850 पिल्लांना जन्म देते. एक साप एका आठवड्याला 2 उंदीर म्हणजे एक जोडी एका वर्षाला (850×52 आठवडे) सरासरी = 44,200 उंदीर... एक साप सरासरी 12 वर्षे जगल्यास 44,200(सरासरी) × 12 = 5,30,40 इतक्या | उंदरांवर नियंत्रण ठेवतो. (सव्वा 5 लाखाहून जास्त)

**साप आणि वन्यजीव अधिनियम १९७२**

वन्यजीवांना संरक्षण देणारा कायदा १९७२ साली अमलात आला असून या कायद्यानुसार | सापांनाही संरक्षण मिळाले आहे.(बेकायदेशीरपणे) साप पकडणे, सापांना मारणे, त्यांचे प्रदर्शन करणे, तस्करी करणे, जवळ बाळगणे, त्यांचा छळ करणे हा गुन्हा आहे. सोबतच १९७५ च्या निर्यात धोरण-वन्यजीवांपासून उत्पन्नाविषयीचा कायद्यात सुद्धा सापांना संरक्षण दिले | आहे. वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ मध्ये 6 परिशिष्ट आहेत. परिशिष्ट 1 (भाग 2 ), परिशिष्ट 2 (भाग 2 ) आणि परिशिष्ट 4 यांच्या अंतर्गत सापांना संरक्षण मिळाले



आहे. परिशिष्ट 1 | ( भाग 2 ) व परिशिष्ट 2 (भाग 2) या सूचीतील सापांना अधिक संरक्षण असून त्याबाबतचे नियमही अत्यंत कडक आहेत. याच्या अंतर्गत येणारे नियम मोडल्यास (सापांना मारणे, त्यांचे प्रदर्शन, तस्करी, छळ इत्यादी) 3 ते ७ वर्षाची कैद व 10 ते १५ हजार रुपयांचा दंड किंवा | दोन्हीही होऊ शकते. परिशिष्ट 4 मधील सापांनाही कडक नियम लागू होतात. ANIMAL | CRUELTY ACT मधेही सापांना संरक्षण देण्यात आले आहे.

**परिशिष्टातील साप खालीलप्रमाणे**

**परिशिष्ट १**
1) भारतीय अजगर (भारतात सापडणारे सर्व अजगर)
2 भारतीय अंडीखाऊ साप (INDIAN EGG EATER SNAKE)

**परिशिष्ट २**
1) नाग 2) नागराज 3) धामण 4) पाणदिवड 5) शेवाळी पाणदिवड 6) घोणस 7) श्वानमुखी सर्प

**परिशिष्ट ४**
परिशिष्ट 1 व परिशिष्ट 2 मधील साप वगळता बाकी सर्व साप परिशिष्ट 4 मध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. **क्रमशः**

# उर्फी जावेदचा बोलवता धनी आता कोण ?
# चित्राताई वाघांची भूमिका समजून घेण्याची गरज ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**चित्रपटसृष्टी म्हणा किंवा मॉडेलिंग विश्वात काम करणारी उर्फी जावेद ही तरूणी अलीकडे भलतीच चर्चेत आली. तिच्या खुलेआम रस्त्यावरच्या अंगप्रदर्शनाला भाजपाच्या महिला प्रदेश अध्यक्षा चित्राताई वाघनी घेतलेला आक्षेप. मुळात एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी ती म्हणजे उर्फी आणि चित्राताई यांचं वैयक्तिक भांडण, किंवा बांधाला बांध शेतीचा लागुन आहे का?तर निश्चित नाही.त्या मुलीला कदाचित अजुनही चित्राताई वाघांनी समोर पाहिलंही नाही. पण एखादी मुलगी अगदी रस्त्यावर एवढं अंगप्रदर्शन किळसवाणे करत असेल तर मग नव्या पिढीने त्याचा आदर्श काय घ्यावा? किंवा भारतीय हिंदु संस्कृतीत हे शोभतं का? असे अनेक प्रश्न पुढे येतात.**

समाजात पागलपणा व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली कुणी करत असेल तर त्यावर कुणी आक्षेप घ्यायला नको का? एवढेच नाही ज्या उर्फीचं प्रकरण समोर आल्यानंतर पुरोगामी विचाराच्या ढोंगी राजकारण्यांनी तिला हाताशी धरून वाद वाढवायला भाग पाडलं. तिथंच मग बिभित्स राजकारण करणाऱ्या पक्षाची त्यांच्या नेतृत्वाचीही कीव येते. एकुण प्रकरणात अगदी तक्रारी पुढे येवु लागल्या, वाद वाढला, पोलीस फिर्यादी झाल्या, राज्य महिला आयोगाकडे देखील उर्फी जावुन आली. त्यानंतर उर्फीचे पुरोगामी विचाराच्या धर्तीवर पडत असलेले ट्वीट हिंदु संस्कृतीचा अपमान करणारे निश्चित म्हणावे लागतील. म्हणुन आता उर्फी एकटी नाही तिच्या बोलवत्या धन्याचा शोध निश्चित घ्यावा लागेल.

भारतीय अध्यात्म शास्त्रानुसार शिजवलेलं अन्न, जवळ असलेली संपत्ती आणि स्त्रीयांचे अंगप्रदर्शन या गोष्टीला जाहिर मान्यता नाही. शिजवलेलं अन्न झाकुन का ठेवलं जातं? कारण त्यावर कुणाची नजर लागुन दुषित होता कामा नये. कुणी जवळची संपत्ती जाहिर का करत नाही? त्यालाही जळावु वृत्ती या शब्दांत अलीकडे वर्णन करावे लागेल आणि महत्वाचे म्हणजे स्त्रीयांचं अंगप्रदर्शन जाहिर नसावं. ही खऱ्या अर्थाने सामाजिक नैतिकता अध्यात्म शास्त्रातुन साधु संत अनेकदा सांगुन जातात. इथे उभा राहिला वाद उर्फी विरूद्ध चित्रा वाद. या वादाला राजकिय खतपाणी घालणं हा मुळात वेडेपणाच म्हणावा लागेल. हमरस्त्यावर मॉडेलिंग करणारी उर्फी अगदी उघडा नंगानाच करते. हे भारतीय संस्कृतीला धरून नाही किंवा समाज व्यवस्था काय आदर्श घेणार? एवढाच आक्षेप चित्रा वाघ यांचा आहे. एक लक्षात घ्या, अलीकडे प्रसिद्धीच्या मुडमध्ये कोण काय करेल? आणि कुठल्या स्तराला जाईल हे सांगणेच अवघड. उर्फी जावेदनं चित्रा वाघ यांनी घेतलेला आक्षेप खरं तर तिच्या करिअरसाठी आवाहन म्हणून घ्यायलाच हवा नव्हता. त्यापेक्षा आपल्या घरात चार भिंतीत व्यक्तीस्वातंत्र्य फायदा घेवु शकतो हे लक्षात घेवुन तिनं माफी मागितली असती तर वाद वाढत नव्हता. पण वर्तमान व्यवस्थेत फोफाळलेला सोशल मिडिया आणि ब्रेकिंग न्युजच्या जमान्यात वावरणारे माध्यम यांना देखील खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृतीला बाधा ठरणाऱ्या गोष्टी ब्रेकिंग ठरत असतील तर खरंच दुर्दैव म्हणावे लागेल. या वादाची दखलच माध्यमांनी घेतली नसती तर उर्फीनं सुरूवातीला केलेलं अंगप्रदर्शन आणि नंतर दाखवलेला नंगानाच कदाचित मागे पडला असता. या वादात अनेकांनी उड्या घेतल्या. शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी देखील उर्फीची पाठराखण केली तर महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकरांनी तर तिला समजुन सांगण्याऐवजी चित्रा वाघ यांच्यासोबत राजकिय चिखलफेक सुरू केली. वास्तविक पहाता संविधानाच्या घटनात्मक निर्माणातुन महिला आयोगाची स्थापना ज्यात अध्यक्षाचेही काही अधिकार आणि आदर्श ज्याचं भान चाकणकरांना राहिलं नाही असंच म्हणावे लागेल. याउलट उर्फीला तक्रार देण्यासाठी बोलावलं. काही समजुन सांगण्याऐवजी पुरोगामी विचाराचे उद बाळगायला लावले. कारण रूपाली चाकणकरांना भेटल्यानंतरच थेट भारतीय हिंदु धर्मावर प्राचीन संस्कृतीवर हल्ला चढवणारे ट्वीट उर्फीने केले. ज्यामुळे खरंच भारतीय संस्कृती हिंदु धर्माचा तिने अपमान केला असं म्हणायला वावगं नव्हे. हिंदु धर्म स्त्रियाबाबतीत उदार मनवादी म्हणुन ओळखला जातो. याचा अर्थ उघडा नंगानाच रस्त्यावर करण्याची मुभा हिंदु धर्माने दिला असा नव्हे. पण उर्फीनं घेतला. प्राचीन हिंदु स्त्रिया असा पेहराव करायच्या यावरही त्यांनी आक्षेप नोंदवला. मुळात या बिचाऱ्या मुलीला प्राचीन संस्कृती हिंदु धर्म हे शब्दसुद्धा कधी आठवले नसतील किंवा वाचलेही नसतील. पण तिच्या डोक्यात पुरोगामीत्वाच्या नावाखाली ज्ञानाची भर अगोदर ज्यांनी टाकली किंवा तिला ज्यांनी शिकवलं याचाच शोध खऱ्या अर्थाने पोलीसांनी देखील घ्यायला हवा. प्राचीन संस्कृती समकालीन व्यवस्थेत पेहराव त्या त्या प्रमाणे होता हे नक्कीच.तेही तो सर्वसमावेशक होता. कारण त्या काळात कपडा वस्त्र कदाचित नव्हते म्हणून अगदी झाडा झुडपाच्या वेलीचेही वस्त्र प्राचीन काळात अंगावर घालायचे. कारण व्यवस्थाही तशीच होती. नंतरच्या काळात बदलत्या व्यवस्थेनुसार स्त्रियांच्या अंगावरचे वस्त्र पुढे आले पण उर्फीसारखा माज, मस्ती हिंदु संस्कृतीत जाणुनबुजुन कुणीही केला नव्हता. चित्रपटातले अंगप्रदर्शन पडद्यावरचा भाग ठरू शकतो पण रस्त्यावर येवुन केलेलं अंगप्रदर्शन समाज व्यवस्थेला अत्यंत घातक असुन भारतीय तरूण पिढी याचा आदर्श काय घेणार? ही चिंता वाटली म्हणूनच चित्राताई वाघ यांनी उर्फीला आवरण्याची मोहिम हाती घेतली. खरं तर शहाण्यांनी चित्राताईच्या भुमिकेला राजकिय चष्म्यातुन पाहण्याचं कसब शोधलं हाच वेडेपणा म्हणावा लागेल. पण वर्तमान व्यवस्थेत प्रत्येक गोष्टीत राजकिय भांडवल त्यालाच राजकारण म्हणतात तो भाग वेगळा. गेल्या पंधरा दिवसापासून राज्यात एकच प्रश्न तो म्हणजे उर्फीला धरून महिलात सुरू झालेला वाद. यात अनेकांनी उडी घेतली. पण व्यक्तीस्वातंत्र्य या नावाखाली ज्या उर्फीच्या अंगप्रदर्शनाचं भांडवल राजकिय बनवल्या जातं त्यांनी कधीतरी अध्यात्मशास्त्र साधु संतांच्या तोंडून ऐकायला हवं. नामवंत किर्तनकारांनी स्त्रियांच्या अंगप्रदर्शनाला अध्यात्मशास्त्राचा विरोध स्पष्टपणे बोलुन दाखवला आहेच. असो. शेवटी ज्या त्या पक्षाच्या विचाराने माणसं चालत असतात. ज्या सुषमाताई अंधारे यांचा मुळ पिंड हिंदु देवाधिकांचा विरोध करणाऱ्या विचाराचा पुरोगामी विचार पुढे घेवुन जाताना उर्फीची बाजु घेणार नाहीत तर मग अंधारे ताई कुठल्या? ज्या राष्ट्रवादी पक्षाला भारतीय संस्कृतीचं आणि हिंदु धर्माच्या आदर्श आचरणाचं काही देणघेणंच नसतं त्या पक्षाच्या महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांना चित्राताई वाघाची भुमिका राजकिय चष्म्यातूनच नाही बघितली तर मग त्या रूपालीताई कुठल्या? अगदी पुण्यातील इतर काही नामवंत महिला भगिनींनी देखील उर्फीचं केलेलं समर्थन असो. वेगवेगळे मतामतांतर यात पुढे येत असले तरी लोकशाहीचं व्यक्तीस्वातंत्र्य एवढं रसातळाला घेवुन जाणाऱ्याची पाठराखण करणं दुर्दैवंच म्हणावे लागेल. चित्राताई घसा ओरडून एका बेफाम मुलीला जिने घातलेला नंगटनाच थांबवण्यासाठी रस्त्यावर उतरल्या त्यांची भुमिका खऱ्या अर्थाने समजावुन घेणे हा आदर्श समाज व्यवस्थेचा भाग म्हणावा लागेल.सद्या तरी उर्फी आता एकटी नसुन तिचा बोलविता धनी कोण?याचाच शोध आता खऱ्या अर्थाने समाजातील विचारवंतांनी घ्यायला हवा.







# शब्द जपून वापरावे !

आधुनिक केसरी

जेव्हा आपण इतरांशी बोलतो. तेव्हा शब्दांचा वापर करावाच लागतो. आपण समोरच्याशी कसे बोलतो.यावरून आपली पारख होत असते.नेहमी बोलताना शब्द जपून बोलले पाहिजे.चुकुन एखादा वेडावाकडा शब्द गेला तर आपण नाती गमावू शकतो. चांगले बोलल्याने नाती अतुट राहतात. माणसाने नेहमीच गोड संभाषण केले पाहिजे. योग्य शब्दांत समजावून सांगितले तर कानांना गोडवा वाटतो. शब्द हे शस्त्राप्रमाणे आहेत.शब्द धारदार तलवारीप्रमाणे आहेत.शब्द शस्त्राप्रमाणे वापरले तर माणसाची मने दुखावली जातात.ऐक वेळ जखम आपण भरून काढू शकतो. पण मनाची जखम कशी भरून काढणार. त्यासाठी बोलुन पश्चात्ताप करण्यापेक्षा बोलण्याआधी विचार केलेला कधीही बरा.

ज्याच्याजवळ माणसं जोडण्यासाठी लागणारे दोन शब्द आहेत. हे वैभव ज्याच्याकडे आहे.तो. खरा श्रीमंत माणूस होय. जेव्हा गरज असेल तेव्हाच बोला शब्दाला कृतीची जोड द्या. नेहमी खरे बोला. बोलताना विचारपूर्वक बोलायला हवे.म्हणतात ना बोलणार्याची माती पण खपते. पण न बोलणाऱ्याचे सोनेपण खपत नाही. शब्दांचा वापर नेहमी विचारपूर्वक केलेला बरा. शब्द हे आपले संस्कार दाखवत असतात.

शब्द हे आयुष्यात फुकट मिळतातं.परंतू आपण ते कसे वापरतो यावरूनच शब्दांची व आपली किंमत ठरते असते.जीव लावणारे शब्द आयुष्यात आपणाला घडवतात.तसेच जिव्हारी लागणारे शब्द आपले आयुष्य बिघडवतात.शब्द हे आपल्याला प्रेम, प्रेरणा देतात.आयुष्यात शब्दांचे मोल अनमोल आहे. ते आपण जपणे गरजेचे आहे. त्यासाठी कोणालाही शब्दानीही दुखवु नका. आयुष्यात एखाद्याला दिलेला शब्द,व उपयोगी पडलेले माणसं कधीच विसरायची नसतात. तेव्हा जीवनात शब्द जपून वापरणे गरजेचे आहे.

संतोष दत्तू शिंदे
संपर्क ७७२१०४५८४५

# चला जाऊया मोझरीला



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**दिनांक २१ व २२ जानेवारीला शेतकरी साहित्य संमेलन संत तुकडोजी महाराजांच्या पावनभुमीत होवू घातले आहे. या साहित्य संमेलनाच्या निमित्याने माझ्याकडे परीक्षणाचे काम आले होते.कथेचंच नाही तर गझल, कविता पुस्तक परीक्षण, वैचारीक लेख व बरंच काही. हे पहिलं परीक्षण होतं माझ्यासाठी की एकाचवेळी वेगवेगळ्या विषयाचं परीक्षण. त्यातच यावेळी मी या परीक्षणासाठी केवळ एकच परीक्षक नव्हतो तर दहा परीक्षक होते या परीक्षणाला. त्याची सरासरी काढून गुणदान करुन क्रमांक काढणार होते या संमेलनाचे आयोजक. ते काम फार जिकीरीचं कामम होतं.. ते काम पार पाडलं आयोजक गंगाधर मुटे यांनी. कथास्पर्धेबाबत थोडंसं सांगतो.**

कथा खुपच मनाला भावणा-या होत्या. आसवं आणणा-या होत्या आणि वेदना मांडणा-या होत्या. ते त्या कथालेखकांचं परीक्षण नव्हतं तर ते माझं स्वतःचं परीक्षण होतं. तशाच कविता आणि गजल तसंच पुस्तक परीक्षण व मागोवाही होता. मुटे साहेबांचं विशेष अभिनंदन की जे आयोजकच नाही तर एक उत्कृष्ट कविताकार, लेखक आहेत. जे मला या निमीत्यानं दिसले. तसेच राजेंद्र फंडही. त्या निमित्तानं हा लिहिलेला लेख. दिनांक एकवीस व बावीस तारखेला मोझरी येथे शेतकरी साहित्य संममेलन असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या पावनभुमीत आहे. हे आगळंवेगळं साहित्य संमेलन आहे असं मत मांडतांना मलाच नाही तर तमाम साहित्यीकांना आनंद होईल. त्याची काही कारणंही आहेत. १) या साहित्यसंमेलनाच्या निमित्त्याने एक अभिनव अशी स्पर्धा राबविण्यात आली. ती अभिनव यासाठी की आतापर्यंत एवढे साहित्य संमेलन झाले. अखिल भारतीय स्तरावरीलही. परंतू त्या संमेलनातून कोणत्याच नवोदीत साहित्यीकाला न्याय मिळालेला वाटला नाही. या साहित्य संमेलनात जे स्पर्धेसाठी लेख आलेत. त्यात कथा आणि केवळ कविताच नव्हत्या तर त्यासोबत रसग्रहण (अनुभव), गेयरचना, छंदोबद्ध कविता, पुस्तक समीक्षण स्पर्धा, मागोवा, वैचारीक लेख या सर्व सर्धेचं एकत्रीकरण करुन घेतलेली स्पर्धा मी पाहिली. कारण कथा, कविता आणमि वैचारीक लेखाच्या स्पर्धा इतर संमेलनातून ब-याच स्वरुपात गाजल्या. परंतू पुस्तक परीक्षण स्पर्धा ही नवीनच वाटली मला. मलाच नाही तर कोणालाही अगदी तसंच वाटेल किंवा वाटल्याखेरीज राहणार नाही.

२) दुसरं कारण म्हणजे इतर साहित्य संमेलनातून आतापर्यंत केवळ ओळखीच्या व्यक्तीमत्वांना संधी मिळाली आणि काही ज्या नवोदीत साहित्यीकांना संधी मिळाली, ज्यांनी हजाराच्या



वर राशी प्रतिनिधी नोंदणी स्वरुपात भरली. त्या साहित्य संमेलनांनी केवळ साहित्यीकांच्या चांगल्या कामगीरींचं प्रदर्शन केलं गेलं नाही तर फक्त ओळखीच्याच साहित्यीकांना व पैसे देणा-या साहित्यीकांनाच न्याय मिळवून दिला. अखिल भारतीय साहित्य संमेलनही याला अपवाद नाही. तिथंही चार ते पाच हजार रुपये मागीतले जातात प्रतिनिधी नोंदणीचे. परंतू या साहित्य संमेलनात केवळ पैशाला महत्व दिलं गेलं नाही. सांगीतलं आहे की कोणताही कार्यक्रम घ्यायला पैसे लागतात तेव्हा काहीतरी शुल्क भरा व सहभागी व्हा. कोणालाही पैसे भरायची जबरदस्ती नाही वा तसे बंधनही नाही.

३) बाकीच्या मी साहित्य संस्था पाहिल्या की त्या साहित्य संस्थेत बोलणारे प्रतिनीधी (परीसंवाद, कथाकथन वा कविता म्हणणारे हे ठरलेले असायचे. परंतू यामध्ये तसा भाग नसून तमाम महाराष्ट्रातीलल सर्वांना या संमेलनानं न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

४) या संमेलनाचं विशेष महत्व म्हणजे या संमेलनात देशाचा जो आधारस्तंभ आहे व ज्या घटकाला आज वंचित संमजलं जातं, त्या घटकाला या संमेलनानं न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

५) शेतकरी......जो देशाचा पालनकर्ता आहे. म्हणतात ना की मैत्री जर करायची असेल तर देशातील शेतक-यांशी करा. कारण तो आपल्या शेतातील वस्तू अगदी निःशुल्क देवू शकतो. इतर कोणी तसं देत नाही. आज त्याच शेतक-याला वंचित समजलं जात आहे. सरकारही त्यांना न्याय देत नाही. आज तोच शेतकरी आत्महत्या करतांना दिसत आहे. महाराष्ट्रात ही संख्या वाढलेली दिसत आहे.

ज्याप्रमाणे महाराष्टातील शेतक-यांना सरकारकडून न्याय मिळालेला नाही, त्याचप्रमाणे त्यांच्या साहित्यालाही कोणी विचारात घेत नाही. सत्य सांगायचं म्हणजे त्यांच्या आत्महत्येसारखीच त्यांच्या साहित्याचीही आत्महत्या होतांना दिसत आहे. त्याच साहित्याला न्याय मिळवून देण्यासाठी व त्या साहीत्याची आत्महत्या होवू नये यासाठीच हे संमेलन आहे.

या साहित्य संमेलनाच्या निमीत्तानं सांगायचं म्हणजे देशातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न या निमीत्तानं होणार असून याचे प्रसिद्ध विचारवंत डॉ. किशोर सानप हे संमेलनाध्यक्ष आहेत. तसेच या संमेलनाचं आयोजन आर्वीचे रहिवाशी असलेले व आता वर्धेत स्थायी झालेले गंगाधर मुटे यांनी केलेले आहे. या संमेलनात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातील शेतकरी कलावंत येणार असून मोझरीत येत्या एकवीस बावीस तारखेस मोठी गर्दी होणार आहे. त्यामुळं आपणही यावे मोझरीला आणि दाखवून द्यावे येथील सत्तेला की आम्ही बुजगावणे नाही की आत्महत्या करु. आमच्याही हातात मोठी ताकद आहे लेखनीची. आम्ही हातात रुमणेही पकडू शकतो आणि लेखणीही.

# खऱ्या गॉड पार्टिकलचे दर्शन घडवणारी कविता 'प्रिय,हा कण गॉड पार्टिकल आहे'

आधुनिक केसरी

**कवयित्री आशा डांगे यांचा परिघाबाहेर या कवितासंग्रहा नंतरचा 'प्रिय, हा कण गॉड पार्टिकल आहे' हा दुसरा कवितासंग्रह आहे. या कवितासंग्रहाच्या शीर्षका पासूनच या संग्रहातील कवितेबद्दल वाचकाला उत्सुकता वाटायला लागतेकी कोणता कण हा गॉड पार्टिकल असेल असं कवयित्री सांगणार असेल. त्या कविते मधून स्त्रीयां बद्दल बोलतात. स्त्री पुरुषासाठी आपलं सर्वस्व देऊन पुरुषासाठी मोकळा पैस निर्माण करून देते. पैस म्हणजे काय तर विस्तिर्ण अशी मोकळी जागा उभी-आडवी, लांबरुंद विस्तारलेली, औरस-चौरस पसरलेली,अघळपघळ जागा मग ती फक्त जागा या अर्थाने नाही तर आपलेपणा, आपुलकी, प्रेम, विश्वास, त्याग या सर्वच बाबी त्यात आल्या. ती हे सगळेच आपल्या साथीदाराला देते.**

हे सर्व देतांना कधीच हातचं राखून ठेवत नाही, म्हणून तिचा सखा तिच्या तना मनात आपोआप एकरूप होऊन जातो आणि स्त्रीचे अवकाश आहे ते सर्व तो गिळंकृत करतो.मग स्त्री-स्त्री न राहता ती घरदार, कुटुंब, संसार, लेकरंबाळ तिच्यावर येणारी बंधन, घरातली माणसं यामध्ये तिचे अस्तित्व हे फक्त एक कणभरापुरते उरते. तिचा जो मोकळा अवकाश होता तो सगळा त्याने व्यापून टाकलेला असतो म्हणून कवयित्री आशा डांगे आपल्या सख्याला सांगताना म्हणतात

**'प्रिय,हा कण अनादीकाळापासून गॉड पार्टिकल आहे**
**हे कसं विसरतोस तू (पृ.७०)**

हा कण म्हणजे स्त्रीचं दातृत्व, तिच समर्पण, त्याच्यासाठीच तिचं जगणं, आपलेपणा आपुलकी, वात्सल्य, प्रेम या रूपातलं अस्तित्व असेल म्हणूनच स्त्री-पुरुष अन् विविध नातेसंबंध हे सगळ आहे. हा कोणालाही न दिसणारा नात्याला घट्ट चिकटून ठेवणारा कण म्हणूनच गॉड पार्टिकल ठरतो.तो कोणालाही दिसत नाही. पण त्याचे अस्तित्व ही कोणी नाकारू शकत नाही आणि ते कोणालाही विसरता येत नाही.

स्त्रीही स्वतः साठी जगायचे सोडून इतरांसाठीच जगत असते. स्त्री ही विविध प्रथा,परंपरा,श्रद्धा-अंधश्रद्धा यांना सोबत घेऊन जगत असते. ती वेगळा विचार करताना दिसत नाही. ती चौकटीबाहेर जाऊ इच्छित नाही. तिला तिचा जो परिघ आहे. त्यातच समाधान मानावं लागतं, कारण तिच्यावर अनेक बंधनं असतात. ती कोणाचे मन मारून ते बंधन तोडू इच्छित नाही. जे दिसतं त्यावर ती सहज विश्वास ठेवते आणि फसते म्हणून कवयित्री आशा डांगे तिला म्हणतात.

**'खिडकीतून दिसणारा आभाळाचा तुकडा आपलाच**
**मानून कशी भुलत जातेस बाई तू' (पृ.१९)**

अशी ही सहज कोणावरही विश्वास ठेवणारी स्त्री आपले दुःख स्वतः सहन करत जगत असते.तिच्या मनातील कोणालाही सांगत नाही. तिला हक्काची , विश्वासाची तीला जागा मिळत नाही. तिच्या मनाच्या जमिनीखाली वेदनेची मुळं खोल पसरत गेलेली असतात. ती कोणालाही दिसत नाहीत म्हणून त्या म्हणतात,

**'कडकडून मिठी मारावी आनंदाने किंवा टाहो फोडून**
**रडावं असं ठिकाण सापडत नाही एखाद' (पृ.३८)**

हा सगळा असला मनात भावनांचा कोलाहल निर्माण करणारे वातावरण भोवताली असतांना कसे जगता येईल आनंदाने. आपले आपले म्हणणारे जेव्हा वरवर खोटं प्रेम, आपुलकी दाखवतात. मनात कटुभाव ठेवून, बेगडी प्रेमाचे प्रदर्शन करतात.तेव्हा खरंच आपलेपणा ,आपुलकी आहे ,की खोटी खोटी हेही एखाद्याला ओळखू येत नाही. ते ओळखू येऊ नये म्हणूनच प्रेमाचे नाटक करणे चालू असते, त्यामुळे निस्वार्थपणे प्रेम करणाऱ्याला हे खोटं ढोंग लक्षात येत नाही.असले वरवरचे खोटे ढोंग नसले पाहिजेत म्हणून त्या म्हणतात.

**'तळमळीची भाषा दुःख गोंजारणारी ढोंग सारेच**
**ओळखता येथेच असही नाही' (पृ.२४)**

असले हे नाते म्हणजे एखाद्या चकव्या सारखे वाटायला लागते. जेव्हा आपलीच माणसं आपल्याच माणसांना वेगवेगळ्या भ्रमात ठेवून फसवू पाहतात तसं नात्यात फसवू नये.हे असले नातेसंबंध असले तरी कवयित्रीला माणसाने माणसासारखे वागणे अपेक्षित आहे. एखादे कर्तव्य करायचे म्हणून सोपस्कारापुरते नाते नसावे तर ते चिरंतन, निस्वार्थ भावनेचे नाते असले पाहिजे म्हणून कवयित्री म्हणते

**'सोपस्काराचं जगणं असलं**
**तरीही खोल मुळांच्या टोकाशी**
**असलेली ओल शोधायचीय**
**मला' (पृ.३८)**

कवयित्रीला खोल मुळाच्या टोकाशी जाऊन शाश्वत ओल शोधायची आहे. चेहऱ्यावर खोटे मुखवटे लावलेल्या या बेगडी जगात श्वासही जपून घ्यायचे दिवस आहेत. कोणी कोणाशी विश्वासाने बोलत नाही, वागत नाही.मात्र कितीही अन्याय झाला तरी स्त्री आपला स्त्रीधर्म सोडत नाही. ती सर्वांना दयाभाव दाखवत कुठलीही अपेक्षा न ठेवता येशूची करुणा मनात ठेवून तिला त्रास देणारालाही मोठ्या मनाने माफ करत असते. ती सर्व दुःख सहन करत. ती तिचा स्त्रीधर्म पाळते, पण तिच्या भोवतालचं जग मात्र मानवधर्म पाळत नाही असे असले तरी कवयित्री समाजाकडे आशेने पहाते. कधी तरी बदल होईल असा विश्वास त्यांना आहे म्हणून त्या म्हणतात.

**'मी मात्र उजेड भरल्या डोळ्यांनी उगवतीचे गीत गात आहे**
**प्रकाश भरल्या डोळ्या सहित नवीन दिवसाला सामोरे**
**जात आहे' (पृ.३२)**




माणूस बदलला म्हणून निसर्गही बदलला आहे त्याप्रमाणे आपल्यालाही आता जगण्याची परिभाषा बदलावी लागणार आहे. कारण दिवसेंदिवस खेड्यातले लोंढे शहराकडे जात आहेत. जो तो शहराच्या गर्दीत दाखल होत आहे. सगळ्यांना कसलीशी घाई झालेली आहे.कुणाला कुणाशी बोलायला,सुखदुःख ऐकून घ्यायला वेळ नाही.वाढत्या शहरात कित्तेक अन्याय-अत्याचार अपघात मृत्यू अशा घटना घडत असतात. कोरोना विषाणू सारख्या भयंकर लाटीच्या लाटी येत आहेत.या सगळ्या बदललेल्या परिस्थितीत आपल्यालाही बदलावं लागणार आहे म्हणून कवयित्री आशा डांगे म्हणतात

**'बदलत जाणारा विषाणूंचा आणि**
**जाणिवांचा व्हेरीयंट**
**ही जगण्याची बदलत चाललेली**
**परिभाषा' (पृ.६५)**

हा असा काळ आला असला तरी एकमेकांच्या मदतीने हातात हात घालून येणाऱ्या परिस्थितीशी लढलो तर नक्कीच आशादायी चित्र पाहायला मिळेल, पण हल्ली कुठल्याच नात्यात ओलावा राहिला नाही.नात्यातला आपलेपणा आपुलकी गोठत चाललेली आहे. त्यामुळे नात्यात गोडी राहिली नाही. स्त्रीने कितीही प्रयत्न करून नाते जपण्यासाठी सर्व सर्कस मधल्या प्राण्या सारख्या कसरती केल्या. झाड होऊन घराला, घरातल्या सगळ्यांना आधार दिला, खचलेल्या पतीला, घराला साथ देण्यासाठी पहाड होऊन सर्वांच्या पाठीशी खंबीर उभी राहिली तरीही हे स्त्रीचा कुठलाच विचार न करता पुरुषाचा पुरुषीपणा,हातचे राखून अलिप्तपणे वागणं हे चालूच असणार आहे. स्त्री मात्र मनात कुठलाच आपपरभाव मनात न ठेवता आपल्या पतीसोबत असते. पतीच्या अशा अलिप्तपणे वागण्या बद्दल आशा डांगे म्हणतात.

**'तू मात्र अलिप्त कमरेवर हात ठेवून उभा असलेल्या**
**विठ्ठला सारखा' (पृ.७८)**

प्रत्येक कवी कवयित्री आपल्या कविता लेखनाबद्दल कविता लिहितो.आशा डांगेही त्यांच्या कविता लेखनाबद्दल म्हणतात.

**'मी कविता लिहिते म्हणजे, एक श्वास घेते मोकळा'**
**(पृ.८३)**

कारण स्त्रीला कोणाजवळही मोकळेपणाने बोलता येत नाही. तिच्या मनातली होणारी घुसमट ती व्यक्त करू शकत नाही. मनातली घुसमट, दुःख कोणाजवळ तरी मोकळी केल्याशिवाय माणूस मोकळा राहू शकत नाही. म्हणून ती कवितेच्या माध्यमातून मोकळ होते. हे मोकळे होणे म्हणजेच मोकळा श्वास घेण्यासारखे आहे अर्थातच जगण्यासाठी एक पाऊल टाकणं आहे. या पाऊल टाकण्यातूनच मुक्तपणे जगणं होणार आहे. त्यानंतर 'माझ्यातली कविता' या कवितेमधूनही त्या त्याने दिलेल्या वेदनांचीच कविता आयुष्यभर सोबत घेऊन जगलेल्या आहेत हेच दिसून येते. त्यांची कविता कशी त्यांच्या भोवतालच्या वेगवेगळ्या मिळणाऱ्या चांगल्या-वाईट अनुभवातून निर्माण होते. हे त्या 'शहरभर विखुरलेले शब्द' या कवितेतून सांगतात. त्यांना शहरातल्या अनुभवातून गल्लीबोळातून आपसूकच शब्द पुरवले जातात आणि कवयित्री कविता लिहायला लागते. आशा डांगे आपल्या कवितेतून ज्ञानेश्वराने जे वैश्विक पसायदान मागितले आहे. तसेच या संग्रहातील 'जीत व्हावी कविता' ही कविता म्हणजे मानव कल्याणाचे दान मागणारी कविता आहे. असे वाटते ज्यामधून सर्वांच्या कल्याणाचे, मांगल्याचे,प्रेमाचे, समृद्धीचे प्रतीक कविता व्हावी असे कवयित्रीने मागणे मागितले आहे. कवितेचा जन्म उगाचच होत नाही त्यासाठी मनात सल असावी लागते. तेव्हा खरी कविता जन्मते.पुढे त्या 'आठवणीचा गलका' या कवितेतून शेवटी अलिप्तपणे वागणाऱ्या त्याला उपरोधिकपणे विचारतात.

**'तू कधी लिहिली आहेस का एखादी कविता ?'**
**(पृ.३५)**

आशा डांगे यांची कविता म्हणजे जगण्यातील खऱ्या गॉड पार्टिकलचे दर्शन घडवणारी कविता त्यांनी लिहिलेले आहे. आपलेपणा आपुलकी, निस्वार्थ प्रेमाच्या रूपाने माणुसकी जपत नाते संबंध जपायला शिकवणारी ही कविता आहे. कवयित्री डॉ.कविता मुरुमकर यांची विस्तृत प्रस्तावना आणि साहित्यिक डॉ.ऋषिकेश कांबळे यांची नेटकी पाठराखण मुळातून वाचाव्यात अशाच आहेत. त्यातून आशा डांगे यांच्या कवितेचे सामर्थ्य आपल्याला दिसून येतील.

**कवितासंग्रह- प्रिय, हा कण गॉड पार्टिकल आहे.**
**कवयित्री - आशा अशोक डांगे**
**प्रकाशन - गोदा प्रकाशन,औरंगाबाद**
**पृष्ठ - १०४, मूल्य -१५०,**

**शरद ठाकर, सेलू, जि.परभणी, ८२७५३३६६७५**

# आर्थिक विषमतेची विदारक दरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**भारतातील आर्थिक विषमतेची विदारक दरी ऑक्सफॉम् या जगप्रसिद्ध संस्थेने जाहीर केली आहे. ऑक्सफॉम् इंडिया या संस्थेने चालू वर्षाचा म्हणजे २०२३ चा आर्थिक अहवाल जाहीर केला आहे. सर्व्हायकल ऑफ द रीचेस्ट; इंडिया स्टोरी नावाच्या या अहवालात अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. या अहवालानुसार भारतातील श्रीमंत आणखी श्रीमंत होत आहेत तर गरीब आणखी गरीब होत असल्याची बाब यातून सामोर आली आहे.**

जगातील टॉप अब्जाधीशांमध्ये भारतीयांची संख्या वाढत असल्याचे या अहवालातून समोर आले असले तरी गरिबांची संख्याही वाढत असल्याचे ही हा अहवाल सांगतो. या अहवालातील सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे देशातील ४० टक्के संपत्ती केवळ १ टक्के धनदांडग्यांकडे आहे म्हणजेच १ टक्के लोकांकडे देशातील जवळपास निम्मी संपत्ती आहे. तर देशातील ५० टक्के लोकांकडे अवघ्या तीन टक्के संपत्तीचा वाटा आहे. ही तफावत गंभीर आहे. याचाच अर्थ देशाची संपत्ती मूठभर लोकांकडे असून देशाची बहुसंख्य लोक हे गरिबीकडे वाटचाल करत आहे. भारतासारख्या विकसनशील देशाला आर्थिक विषमतेचे हे चित्र मानवणारे नाही. २०२० साली जेंव्हा देशात कोरोना आला तेंव्हापासून गरिबांची संख्या झपाट्याने वाढू लागली आहे. कोरोनामुळे अनेकांचा रोजगार बुडाला. अनेक नॅशनल मल्टिनॅशनल कंपन्यांनी नोकर कपात केली त्यामुळे मध्यमवर्ग निम्नमध्यमवर्ग बनला तर जो निम्नमध्यमवर्ग होता तो गरीब झाला. आणि जे गरीब होते त्यांना तर एकवेळच्या अन्नासाठी दाही दिशा भटकावे लागले. देशातील बहुसंख्य सर्वसामान्य वर्गाची कोरोनाने अशी अवस्था केली असताना देशातील मूठभर धनदांडग्यांवर मात्र त्याचा काहीही परीणाम झाला नाही उलट त्यांची संपत्ती वाढतच गेली अर्थात या धनदांडग्या उद्योगपतींवर सरकारची मेहरनजर होती हे वेगळे सांगायला नको. सरकारने हात दिल्यानेच त्यांची संपत्ती कैक पटीने वाढली हे सत्य कोणीही नाकारू शकणार नाही. सरकार उद्योगपतींसाठी पायघड्या घालते मात्र सर्वसामान्य जनतेसाठी एकवेळचे अन्न पुरवू शकत नाही हे कटू असेल तरी सत्य आहे. विशेष म्हणजे ज्या उद्योगपतींसाठी सरकार पायघड्या घालते तेच उद्योगपती देशाचा कर भरताना मात्र कुरकुर करतात अनेक उद्योगपती देशाचा कर चुकवतात. याउलट देशातील गरीब लोक मात्र नित्यनियमाने कर भारतात अत्यावश्यक



वस्तूंवर खर्च करतात. आता वेळ आली आहे की श्रीमंतांकडूनही त्यांचा वाटा घेण्यात यावा. श्रीमंतांवर संपत्ती कर लावल्यास करामध्ये चांगली वाढ होऊन ही तफावत कमी होईल. देशातील १० अब्जाधीशांवर पाच टक्के एकरकमी कर आकारला तर मिळणारी रक्कम ही २०२२ - २३ साठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय आणि आयुष मंत्रालयाच्या बजटपेक्षा १.५ ने अधिक असेल. देशातील १०० भारतीय उद्योगपतींवर २ टक्के अतिरिक्त कर लावला तर देशातील कुपोषणाची समस्या कायमची मिटेल पण सरकार हे करणार नाही. हेच काय कोणतेही सरकार हे करणार नाही कारण राजकीय पक्षांना निवडणुकीसाठी हेच उद्योपगपती निधी देतात. त्यांच्याच जीवावर राजकीय पक्ष आणि नेते निवडणूक लढवतात त्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त कर लावण्याची हिंमत कोणतेच सरकार दाखवणार नाही. जो कर , टॅक्स लावायचा तो सरकार गरिबांवरच लावणार. गरीब बिचारी कुणीही हाका अशी गरिबांची अवस्था आहे. त्यांना एक महिन्याच्या खर्च कसा भागवायचा याची ददात पडलेली असते. इकडे गरिबांना महिन्याचा खर्च भागवताना नाकीनऊ येते असताना तिकडे देशातील अब्जाधीशांच्या संपत्तीत दर दिवशी २. ७ अब्ज रुपयांनी वाढ होत आहे. हे सर्व आकडे ऑक्सफॉमच्या ताज्या अहवालातील आहेत. देशातील गरीब श्रीमंतातील दरी खूप वाढली आहे. देशातील गरीब श्रीमंतांची ही दरी देशाच्या विकासाला मारक आहे. आजही मूठभर वर्गाकडे देशातील बहुसंख्य संपत्ती असणे ही बाब देशाच्या प्रगतीला खीळ घालणारी आहे. या अहवालातून देशातील गरीब श्रीमंतांची दरी किती रुंदावली आहे हेच दिसून आले आहे. देशातील ८० टक्के जनता उपाशी किंवा अर्धपोटी झोपते असा एक अहवाल मध्यंतरी आला होता. देशातील गरीब आणखी गरीब होत आहे तर श्रीमंत आणखी श्रीमंत होत आहे हे चित्र बदलायला हवे.



# यशाची मानसिकता

आधुनिक केसरी

एखादं काम करताना आपल्याला अपयश आलं, आपला पराभव झाला म्हणजे सगळं संपलं असं कधीच होत नाही.उलट पराभव किंवा अपयशा शिवाय यशस्वी होताच येत नाही. अपशातून खूप काही शिकायला मिळते. आत्मविश्वासाला नविन बळ मिळते. म्हणून काही आपण कुठलेही काम अपयशी होण्यासाठी नव्हे तर यशस्वी होण्यासाठीच करायला हवे. त्यातून पराभव झालाच किंवा अपयश आलेच तर ते मोठ्या मनाने स्विकारायला हवे आणि त्या पराभवाची कारण मिमांसा करायला हवी. त्यातून जे निघेल ते नक्कीच फलदायी असेल. अनुभवाच्या कसोटीवरच आपले यश टिकून रहाते. तुम्हाला जो अनुभव मिळाला आहे त्याचा पुरेपूर वापर करा. पराभवाची मानसिकता कधीही अंगीकारू नका आणि पराभवाचे शल्य मनात अजिबात बाळगू नका. आलेल्या अपयशातून धडा घेऊन तुम्हाला पुन्हा उभे रहायचे आहे. लहान मुल सुद्धा पडत पडतच चालायला शिकते. त्याचप्रमाणे अपयश आले तरीही तुम्हीच जिंकणार आहात कारण तुमची मानसिकता यशस्वी होण्याची आहे.

**जयेश अ. माधव**

# कोरोनावरील डोस कायमस्वरुपी उपलब्ध ठेवणे सरकारची जबाबदारी

आधुनिक केसरी

मागील दोन वर्षात देशातील जनतेने कोरोना सारख्या तीव्र साथीच्या आजारातून संक्रमण केले या दरम्यान अनेकांना मृत्यूने कवटाळले तर काहींना रस्त्यांवर आणले पण कोरोना प्रतिबंधक डोस दिल्यामुळे या किरोना महामारीला बऱ्यापैकी अटकाव बसला मात्र या महाभयंकर आजाराचे समूळ उच्चाटन झालेले नसताना सरकारकडे कोरोना आजारावरील डोस उपलब्ध नसणे ही सरकारची बेफिकीरचं म्हणावी लागेल या आजाराचा मागील अनुभव लक्षात ठेवून मार्गक्रमन करणे गरजेचे असताना या आजाराकडे सरकारचे दुर्लक्ष झाले आहे असेच म्हणावे लागेल सद्या महाराष्ट्रात, मुंबई, नवी मुंबईसह राज्यभरात गोवरचे रुग्ण आढळले असून त्याच्या तक्रारी वाढत आहेत तसेच चीन व अन्य देशातून येणाऱ्या प्रवाशांना कोरोनाच्या नव्या संक्रमणाने घेरल्याचे दिसून आले आहे त्यामुळे पुन्हा एकदा जनतेच्या उरात धडकी भरली आहे कोरोनाची भिती अजुनही जनतेने विसरलेली नाही या आजारामुळे काहींना प्राण तर काहींच्या घरातील कर्ता माणूसच हिरावला आहे त्यामुळे या आजाराची दाहकता दिसून येते या आजाराची सरकारला कल्पना असताना देखील डोस उपलब्ध नसणे हे खेदजनकचं म्हणावे लागेल मात्र या आजाराचे गांभीर्य ओळखून सरकारने आता कायमस्वरुपी डोस उपलब्ध ठेवणे जरुरीचे वाटत आहे जो पर्यंत कोरोना आजार जगातून हद्दपार होत नाही तोपर्यंत का होईना हे डोस उपलब्ध ठेवणे ही सर्वस्वी जबाबदारी सरकारची आहे !!

**राजू जाधव, मांगूर, जि.बेळगांव**

# आयुष्य हे भावनेच्या लाटेवर वाहत जाऊ द्यायचे नसेल तर अंतर्मन निर्विकार ठेवले पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपलं मन निर्विकार ठेवल्या खेरीज आपलं भविष्य सुरक्षित होत नाही.हे वास्तव आहे.कारण आयुष्य हे भावनेच्या लाटेत वाहुन जाऊ देयच नसेल तर मग मात्र आपलं मन हे निर्विकार असलच पाहिजे. जीवनातील कोणत्याही चुकीला माफि संधी नसते.सिनेमा सारखा वास्तवात रिटेक इथं नक्कीच नसतो .एकदा आपल्या हातुन एखाघी घटना घडली कि मग मात्र त्याचे परिणामच दिसणार मग ते परिणाम कसे असतील ते वेळ ठरवते .पुन्हा विचार करून फार काही उपयोग होत नाही. पण याचा परिणाम आपल्या अंतर्मन , बुद्धी आणि पर्यायाने शरिरावर न होऊ देणं हेच मोठं कौशल्य आहे . आणि त्या साठी आपलं मन सदैव चैतन्ययुक्त असल पाहिजे. त्यामुळे आपण स्वतःला , ताण, तणाव मुक्त आणि निर्विचार ठेवु शकतो. आणि एकदा हे कौशल्य आपण अलगत केले कि मग मात्र आपल्याला मिळालेलं आयुष्य हे सार्थकी लागेल.**

दैनंदिन जीवनात वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने ताण,तणाव किंवा हर्ष निर्माण होणं स्वाभाविक आहे. नैसर्गिक आहे परंतु आपल्या मनात निर्माण होणारा तणाव निवळता येण ही एक प्रकारची साधना तपश्चर्या आहे. हाच मानतील तणाव भावनिक लाट निर्माण करतो आणि हि लाट आपल्याला आशा ठिकाणी घेऊन जाते कि पुन्हा परतीचा थांग पत्ता लागत नाही.आपले मन हेच आपला खरा मित्र आहे. आणि वेळप्रसंगी आपल मन हेच आपला मुख्य शत्रू आहे.मनात जेव्हा सकारात्मक विचार चालू असतात तेव्हा आपलं मन हे आपल्याला योग्य दिशेने घेऊन जाते . चैतन्य कायम राहुन आपण प्रफुल्लित राहतो. तसेच दुःख ही कल्पना पण आठवत नाही. जेवढी संसाधन आपल्याकडे आहेत त्यावरच आपण समाधानी असतो आणि नेमकं यावेळी आपलं अंतर्मन हे आपला खरा मित्र असत.परंतु हेच अंतर्मन जेव्हा आपल्या मनात नकारात्मक विचार निर्माण करत. वेगवेगळ्या प्रकारचे अवास्तव भ्रमक, नैराश्य पुर्ण असे विचार वारंवार निर्माण करत. तेव्हा आपल्या जीवनात शारिरीक थकवा वैचारिक तणाव आजार सदृश परिस्थिती म्हणजे डिप्रेशन निर्माण होत . तेव्हा हेच आपलं मन आपला प्रमुख शत्रू असत. ज्या मुळे आपलं कधींही भरून निघणार नाही असं नुकसान होत . म्हणून निर्विचार मन ठेवता येण ही जीवनातील सगळ्यात मोठी तपश्चर्य आहे. दैनंदिन जीवनात आपण विविध घटनाक्रम पाहत असतो. प्रत्येक व्यक्ती च्या जीवनात वेगवेगळ्या प्रकारच्य विषयासंदर्भात अडचणी ,समस्या, संकटं,वादळ,येत असतात तसेच त्यानुसार आपल्याला सुख किंवा दुःख जाणवतं असतं. जीवनाच्या मार्गक्रमणावर वेगवेगळ्या टप्प्यांवर काही अपेक्षित घटना घडामोडी घडत असतात .तर काही अनपेक्षित घटना हि घडत असतात .या सर्व घटना आपल्या मनावर आणि जीवनावर गंभीर असे परिणाम करत असतात. तसंच दैनंदिन जीवन जगत असताना आपल्याला आपल्या परिवारातील किंवा समाजातील किंवा आपण ज्या विभागात राहतोय तिथ किंवा आपल्या देशात तसेच जगभरात आश्चर्य वाटले असे काही तरी दैनंदिन चांगलं किंवा वाईट घडत असतं आणि याचे दुरगामी परिणाम आपल्या मनावर होत असतात. साधरणता आपल्या मनाचे दोन प्रकार असतात एक अंतर्मन आणि दुसरं बाह्य मन . बाह्यमन हे फार गंभीर नसते. जेवढ्या लवकर ते परिणाम करून घेते तेवढ्याच लवकर ते स्थिर शांत पण होत हेच बाह्य मनाचं मुख्य वैशिष्ट्य आहे. एका क्षणात ते कित्येक विचार निर्माण करते. त्यावर मार्ग काढते आणि त्यातील अन् आवश्यक असणारे विचार नष्ट पण करते म्हणजे बाह्य मन हे फार संवेदनशील नसते ते अगदी सहज असत. बाह्य मन हे संवाद साधुन किंवा करमणुकीची साधन वैचारिक चर्चा, योग्य व्यक्ती सोबत संवाद या माध्यमातून निर्विचार होते आणि आपल्याला लगेच तणाव मुक्त जाणवतं



परंतु खरा विषय हा आहे की अंतर्मनाचा हे खुप घातक असतं. ते खुप संवेदनशील असत. सगळ्यात अगोदर ते आपल्याला एकटं पाडत अहंकार निर्माण करत एखाद्या विषयावर आपला स्वाभिमान दुखावला आहे. याची वारंवार आपल्यला जाणीव निर्माण करुन देत आणि याच विषयावर सारखं सारखं आपल्यला फिरवुन आणत आणि कधी कधीतर आपल्याला डिप्रेशनपर्यंत घेऊन जात. आणि तेच डिप्रेशन पुढे चालून घातक रूप धारण करून आपल्यला नकारात्मक दिशेने प्रवास करण्यासाठी भाग पाडत .आणि या नकारात्मक दिशेने प्रवास करताना आपण कधी कधी इतकं दुर जातो. की पुन्हा परत वापस येण्याचे मार्ग संपुष्टात येतात आणि आपण स्वतः सह आपल्या कुटुबीयांचे तसेच अनेक आप्तस्वकीय यांचे नुकसान करतो. त्यामुळे त्यांन दुःख वेदनांना समोर जावं लागतं. अशा अनेक घडामोडी घटना सध्या आपल्या आजुबाजूला घडताना दिसत आहेत. याच मुळ हेच आहे की अंतर्मनमध्ये असणार दुःख वेदना ह्या ज्या आपल्याला चेहर्यावर दिसत नाहीत. परंतु आपलं मन पोखरतात आणि नेमकं हेच गणित कुणालाही ओळखायला येत नाही. आपल्या आजूबाजूला असणार कोणिही अंतर्मनातील हलाचाल ओळखत नाही आणि सर्व जण आपापल्या सर्वसाधारण समजतात. गफलत इथंच होते आपल्या मनात दुःख वेदना सल असेल तर आपल्या जीवनामध्ये आपल्याला वेळोवेळी मार्गदर्शन करण्यासाठी कोणीतरी योग्य मार्गदर्शक असला पाहिजे आणि किमान आपलं दुःख त्याच्याकडे बोलून त्याची तीव्रता कमी केली पाहिजे. अंतर्मनातील विचारावर जेवढी चर्चा करू आपल्या मार्गदर्शकाडे किंवा आपल्या जीवनात असणारा योग्य असा स्नेही याच्याकडे बोलून त्याची तीव्रता आपण कमी करू शकतो. पण यावेळी आपला अंहकार शुन्य असला पाहिजे. तेव्हा नक्कीच आपलं भविष्यात होणार खुप मोठा नुकसान टाळल जातं. त्यामुळे व्यक्त होण हे खुप आवश्यक आहे. आणि व्यक्त होण्यासाठी कोणीही आपला मित्र मार्गदर्शक नसेल तर अध्यात्मिक ज्ञान जाणुन घ्या तसेच आपल्या अध्यात्मिक ज्ञान कक्षा एवढ्या रूंदावल्या पाहिजे कि जगाच्या पाठीवरील सगळ्यात मोठं दुःख किंवा दुःखांचा डोंगर हा आपल्याला शुन्य वाटला पाहिजे आणि आपलं अंतर्मन हे सदैव स्थिर शांत निर्विचार रहिल पाहिजे.नव्हे ते ठेवता आलं पाहिजे.आणि निर्विचार अंतर्मन ठेवता येण हि जीवनातील सगळ्यात मोठी तपश्चर्य साधना आहे हि साधना तपश्चर्या ज्याला जमली तो खरंच धन्य आहे . त्यासाठी योग्य मार्गदर्शक आणि आध्यत्मिक ज्ञान जीवनात खुप आवश्यक आहे.

# आचारसंहितेचा भंग; कोल्हे यांच्या अंगलट येणार कॅलेंडर

आधुनिक केसरी न्यूज

गोरख पाटील

**कन्नड :** माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे यांनी शिक्षक मतदार संघाची निवडणूक आचारसंहिता लागू असताना नगपरिषदेचा लोगो लावून कॅलेंडर प्रकाशित केले. या प्रकरणी तहसीलदार संजय वारकड यांनी (ता.१७) नगरपरिषदेचे प्रशासक नंदकिशोर भोंबे यांना संबंधित प्रकरणाची चौकशी करून गुन्हे नोंदविण्याचे निर्देश दिले आहेत. सामाजिक कार्यकर्ते उद्योजक मनोज पवार मित्रमंडळ यांनी अप्पर जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अनंत गव्हाणे व तहसीलदार संजय वारकड यांच्याकडे तक्रार नोंदविली आहे. यात त्यांनी नमूद केले आहे की, ३० डिसेंबर २०२२ पासून शिक्षक मतदार संघ निवडणूक आचार संहिता जिल्ह्यात लागू आहे. नगरपरिषदेने राजकीय पक्षांनी व कार्यकर्त्यांनी शहरात लावलेले सर्व बॅनर काढून टाकले. माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे यांनी ते सध्या पदावर नसताना नगपरिषदेचा लोगो वापरून २०२३ या वर्षाचे कॅलेंडर प्रकाशित केले.
सदरील कॅलेंडर नगरपरिषदेचे प्रशासक नंदकिशोर भोंबे यांच्या दालनात व इतर अधिकारी




कर्मचाऱ्यांच्या दालनात लावले. सफाई कर्मचारी व नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांच्या मार्फत कॅलेंडर जनतेत वितरित केले. या प्रकरणी माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, कॅलेंडर प्रकाशक, संबंधित कर्मचारी यांच्या विरोधात आचारसंहिता भंगाचा गुन्हा नोंदविण्यात यावा. या तक्रारीची दखल घेऊन तहसीलदार संजय वारकड यांनी नगरपरिषदेचे प्रशासक नंदकिशोर भोंबे यांना या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर निवडणूक आचारसंहिता भंगाचा गुन्हा नोंदविण्यात यावा, असे निर्देश दिले आहेत. त्यामुळे नगरपरिषदेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांत खळबळ उडाली आहे. या संदर्भात नगरपरिषदेचे प्रशासक भोंबे यांनी कारवाईला केराची टोपली दाखवली अशीही चर्चा सुरू आहे यात नेमक काय होणार याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.



# आदर्श इंग्लिश स्कूलमध्ये स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील वाकला येथे आदर्श इंग्लिश स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चिमुकल्यांनी विविध गाण्यावर नृत्य सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. हिंदी मराठी गाण्यावर नृत्य सादर केले. यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संदीप पाटील साहेब एपीआय शिवूर पोलीस स्टेशन तसेच त्यांचे सर्व सहकारी तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गावचे प्रथम नागरिक सरपंच जयनाथ भाऊ त्रिभुवन आणि उपसरपंच दिलीप काका निकम आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य सोसायटी चेअरमन व सर्व संचालक मंडळ , छावा संघटनेचे तालुकाध्यक्ष किशोर मगर आणि पांडुरंग इंग्लिश स्कूलचे संस्थापक संतोष सूर्यवंशी , ग्रामपंचायत सदस्य राधाकृष्ण सोनवणे शांताराम मगर,भिकन सोमासे ची उपस्थिती होती या कार्यक्रमास गावातील संपूर्ण नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निखिल वाघ यांनी केले आदर्श इंग्लिश स्कूलचे संस्थापक श्री साईनाथ बबनराव वाघ आणि इंग्लिश स्कूलच्या संचालिका श्रीमती सोनाली वाघ तसेच शिक्षिका रूपाली वाघ आणि आदर्श स्टडी सेंटर कोचिंग क्लासेसचे सहसंचालक निखिल रविंद्र वाघ यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम अतिशय उत्साहाने साजरा करण्यात आला.

# मोहाडी येथील थकबाकी मोबाईल टॉवरला जप्ती पथकाने ठोकले सील

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** थकबाकीदारांविरोधात कारवाईचे सत्र सुरूच मालमत्ता कर थकबाकीदारांविरोधात महापालिकेच्या मालमत्ता विभागाकडून नियमितपणे जोरदार कारवाई सुरू आहे.मोहाडी भागातील प्रमिला वामन ठाकूर यांचे जागेवरील A.T.C मोबाईल टॉवर यांचे कडे थकबाकी रक्कम 4,77,197 रुपये बाकी असल्याने सील करण्यात आले अधीक्षक शिरीष जाधव, अधीक्षक मधुकर निकुंभ, निरीक्षक अजय देवरे, मनोज चिलंदे, संजय माईनकर आदींनी कारवाई केली. शहरातील एका मोबाईल टॉवरच्या थकबाकीदारासह इतरांकडेही पथक गेले होते. मात्र, त्यातील काहींनी थकबाकीची रक्कम अदा केल्याने त्यांच्यावरही कारवाई झाली नाही. दरम्यान, जप्तीसारखी कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी आपल्याकडील थकबाकी अदा करावी असे असे आवाहन महापालिकेच्या कारवाई पथकाने केले.



# सबनीस यांच्या हस्ते 'शृंगार मनाचे' प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

बाबूराव गोणारकर

**धर्माबाद :** हुतात्मा पानसरे हायस्कुल, धर्माबाद येथील मराठी विषयाचे शिक्षक पांडुरंग आडबलवाड यांच्या 'शृंगार मनाचे' काव्य संग्रहाचे प्रकाशन मंगळवारी (ता.17) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, सुप्रसिद्ध साहित्यिक श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी हे होते. तर या प्रकाशन सोहळ्यास ग्रामीण कवी शंकर वाडेवाले,संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र पाटील बन्नाळीकर,विश्वस्त श्रीनिवास रत्नाळीकर, सहसचिव सुरेश गंजेवार,डॉ. कमलकिशोर काकाणी, दिनेश सारडा,ललिता सबनीस, सरोजा पाटील,शालिनी अडबलवाड,मंगला जोशी, मुख्याध्यापक सन्मुख बेंबरेकर, माधव मठपती, ज्येष्ठ पत्रकार जी.पी. मिसाळे, ना.सा.




धर्माबाद शहरात व आमच्या हुतात्मा पानसरे शाळेत असे गुणवान शिक्षक कवी आहेत .याचा आम्हाला अभिमान आहे .
**विश्वनाथ पा .बन्नाळीकर, सचिव, हुतात्मा पानसरे हायस्कुल**

येवतीकर, यांची प्रमुख उपस्थिती होती.
कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे सचिव ॲड.विश्वनाथ पा.बन्नाळीकर यांनी केले. पांडुरंग आडबलवाड यांनी आपल्या मनोगतात आपल्या जडण घडणीचे श्रेय विद्यार्थी, आई,डॉ. संजय देशमुख व विश्वनाथ पा.बन्नाळीकर यांना दिले.आपले काव्यसंग्रह त्यांनी आपल्या आईला समर्पित केले. श्रीपाल सबनीस यांनी शृंगार मनाचा काव्य संग्रहातील कवींच्या मनाचा संवेदनशीलपणा, अर्धांगिन नव्हे पूर्णगांनी म्हणून पत्नीकडे बघण्याची दृष्टी,प्रियेसीशी असलेली एकनिष्ठता, आत्मा - परमात्माचे मिलन, मनाच्या शृंगाराची अनोखी मांडणी यावर भाष्य केले.
सूत्रसंचालन बालाजी पचलिंग,अरुण भूसलवाड यांनी केले. तर ज्योती पडगलवार यांनी आभार मानले.

# त्र्यंबकेश्वरसाठी जादा बससेवा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज यात्रोत्सवानिमित्त भाविकांच्या सोयीसाठी महानगरपालिकेच्या सिटीलिंकच्या वतीने बुधवार आणि गुरूवार या दिवशी त्र्यंबकेश्वरसाठी जादा बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रोत्सवानिमित्त हजारो वारकरी संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज यांच्या समाधीस्थळी नतमस्तक होण्यासाठी त्र्यंबकेश्वरकडे मार्गस्थ होत आहेत. पायी दिंडी दाखल होत असल्या तरी बुधवारी मोठ्या संख्येने भाविक त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी जाणार असल्याने भाविकांच्या सोयीसाठी नाशिक महानगर परिवहन महामंडळाच्यावतीने जादा बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सिटीलिंकच्यावतीने तपोवन आगारातून १५ गाड्यांच्या माध्यमातून



दिवसभरात १०६ तर, नाशिकरोड आगारातून १० गाड्यांच्या माध्यमातून ६० फेऱ्या त्र्यंबकेश्वरसाठी केल्या जातात. या नियमित फेऱ्यांव्यतिरिक्त यात्रोत्सवानिमित्त तपोवन आगारातून सहा जादा बससेवेच्या माध्यमातून ४८ तर नाशिकरोड आगारातून चार जादा बससेवेच्या माध्यमातून ३२ अश्या एकूण १० जादा गाड्यांच्या माध्यमातून ८० अधिक फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. बुधवार आणि गुरूवार असे दोन दिवस ही बससेवा असले. जादा बससेवा मिळून या काळात तपोवन आगारातून १५४ तर, नाशिकरोड आगारातून ९२ फेऱ्या नियोजित आहेत.

# राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

## डॉ. विजयकुमार मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील फर्दापूर पोलिस ठाण्यात दि.१७/१/२०२३ मंगळवार रोजी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह २०२३ निमित्त माननीय पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया साहेब व माननीय अपर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार साहेब तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार मराठे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली फर्दापूर पोलिसांनी रस्ता सुरक्षा सप्ताहनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. दिनांक 11.01.2023 ते 17.01.2023 या कालावधीत राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहअंतर्गत मौजे फर्दापूर व अजिंठा लेणी टी पॉइंट येथे वाहतूक सुरक्षा बाबत मार्गदर्शन करून मोटरसायकल चालक यांनी मोटरसायकल चालवताना हेल्मेटचा वापर करावा. ट्रिपल सीट कोणालाही बसू देऊ नये किंवा चालवू नये तसेच काळी पिवळी, ऑटो रिक्षा व इतर वाहने यांनी आरटीओ यांनी ठरवून दिलेल्या नियमा प्रमाणे प्रवासी वाहतूक करावी त्यापेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करू नये व अपघातास आमंत्रण देऊ नये. वाहने वेगात चालवू नये. मॉर्निंग वॉक करणा-यांनी पायी चालताना रस्त्याच्या उजव्या बाजूचा वापर करावा. रस्ता वाहतुकीचे सर्व नियम पाळण्यात यावे. यापुढे आपल्या 18 वर्षा खालील पाल्यांना वाहने चालविण्यास देऊ नयेत. अन्यथा पोलीस यापुढे नियमित कारवाई करतील व पालकांना नियमाप्रमाणे प्रत्येकी 5000/- रुपये एवढा दंड




आकारण्यात येईल. अपघात ठिकाणी तत्काळ मदत करावी. वाहनांना रिफ्लेक्टर बसवावेत. शालेय विद्यार्थी वाहतूक करणारी वाहने सुस्थितीत असावी त्यांनी वेग मर्यादेची व वाहतूक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी अशा सूचना देऊन रस्त्यावरील प्रवास सुरक्षितपणे व्हावा यासाठी आवाहन करून रस्ता सुरक्षा बाबत जनजागृती केली आहे. तसेच विविध शाळा व महाविद्यालयातील सहलीसाठी आलेल्या शालेय विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियमाचे पालन करण्या संदर्भाने जनजागृती करण्यात आलेली आहे. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या इसमांवर सुद्धा मोठ्या प्रमाणात मोटार वाहन अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे. रस्ता सुरक्षा ही काळाची गरज असून सुरक्षित प्रवास होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी सर्वांनी वाहतूक नियमांचे पालन करण्याचे अशे आवाहन सपोनि देवीदास वाघमोडे पोलीस स्टेशन फर्दापूर यांनी केले आहे.

# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत बाफना हायस्कूलचा नावीन्यपूर्ण उपक्रम

## चित्र रंगभरण स्पर्धेच्या माध्यमातून जनजागृती : शहर वाहतूक शाखेने घेतला पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत फागणे गावातील सी एस बाफना हायस्कूल व सरस्वती कन्या विद्यालय या ठिकाणी चित्र रंग भरणा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर ही स्पर्धा धुळे तालुका पोलीस ठाण्याच्या संकल्पनेतून व शहर वाहतूक शाखा आणि रस्ता सुरक्षा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात आली. या स्पर्धेच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा संदर्भात विशेष अशी जनजागृती करण्यात आली आहे. इयत्ता ७ , ८ व ९ मधील शिक्षण घेणाऱ्या एकूण २८८ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. याप्रसंगी पंच कमिटीच्या वतीने निकाल जाहीर करून प्रथम, द्वितीय तृतीय आणि उत्तेजनार्थ दोन विद्यार्थ्यांना धुळे जिल्हा पोलीस दलातर्फे स्मृतिचिन्ह व बक्षीस वितरित करण्यात आले. सदरची स्पर्धा ही शालेय विद्यार्थ्यांना वाहतुक नियमनांची माहिती अवगत व्हावी तसेच रस्त्यावरील होणाऱ्या अपघाताचे प्रमाणे कमी व्हावे व अपघात मुक्त् प्रवास कसा व्हावा या संदर्भात विशेष जनजागृतीसाठी जिल्हा पोलीस दल व रस्ता सुरक्षा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे तालुका पोलीस प्रशासन व शहर वाहतूक शाखे तर्फे हा नाविन्य उपक्रम राबवण्यात आला. त्याचप्रमाणे अंधारात रस्त्यावर चालणारी किंवा उभी असलेली बैलबंडी दिसावी म्हणून बैलगाडी तसेच ट्रॅक्टरच्या मागील बाजूस रेडियम रिफ्लेक्टर लावण्यात आले आहेत.

सदर हा उपक्रम पोलीस अधीक्षक संजय बारकुंड ,अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे धुळे ग्रामीण उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप



मैराळे यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक, धीरज महाजन यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात आला आहे. या कार्यक्रमाप्रसंगी - शाळेचे चेअरमन मधुकर सूर्यवंशी, ग्रामीण विभाग उप विभागीय पोलीस अधिकारी प्रदीप मैराळे, पोलीस निरीक्षक धुळे तालुका पोलीस ठाणे. दत्तात्रय शिंदे, वाहतूक शाखेचे पीआय धीरज महाजन,उपनिरीक्षक अनिल महाजन , अध्यक्ष - रस्ता सुरक्षा फाउंडेशन धुळे महेश नेरकर , शाळेचे अध्यक्ष मधुकर देवराम पाटील अध्यक्ष, संचालक निखिल शिंगवी, सरपंच विदया नागराज पाटील यांचे प्रतिनिधी नागराज पाटील, मुख्याध्यापक दिलीप सूर्यवंशी, मुख्याध्यापिका विद्या देवरे. ग्रा. सदस्य.बालचंद्र सूर्यवंशी,चित्रकला शिक्षक नरेंद्र सुर्यवंशी शिक्षीका नलिनी चव्हाण. आदी उपस्थित होते. धुळे तालुका पोलीस हेडकॉन्स्टेबल व फागणे बिट अमलदार दिनेश लोटन देवरे यांच्यासह तालुका व वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमाला परिश्रम घेतले.

# वैजापूरात भागवत कथेची तयारी पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** ज्यांना देशात शांतिदुत व धर्मरत्न म्हणून ओळखल्या जाते ते महंत श्री, देवकीनंदन ठाकूर जी महाराज यांच्या अमृत वाणीतून श्रीमद भागवत कथा ऐकण्यास संपूर्ण औरंगाबाद जिल्हा आतुर झालेला आहे,श्रीमद भागवत कथा शुक्रवार( ता,२० )पासून आरंभ होत आहे, या भागवत कथा ची तैयारी वैजापूर शहरात जीवनगंगा परिसरात पूर्ण झाली असून या कार्यक्रमाच्या नियोजन बाबत कल्पना देण्यासाठी मंगळवार( ता,१७ )रोजी उत्सव समितीचे अध्यक्ष राजूसिंह जोगीलाल राजपूत,कार्याध्यक्ष भावलाल काका सोमासे व कोषाध्यक्ष गोकुळ राजपूत यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. धोंडीरामसिंह राजपूत यांनी गठीत करण्यात आलेल्या समित्याची कार्य विस्ताराने विशद केली. सात दिवशीय कार्यक्रमाचे नियोजन सादर केले. शुक्रवार( ता,२० )रोजी देवकीनंदन ठाकूर महाराजांचे आगमन शहरात होत असून त्यांची रथातून भव्य मिरवणूक या निमित्ताने आयोजित करण्यात आलेली आहे. या मिरवणुकीत उंट, लेझीम पथक, भजनी मंडळ व कलशधारी महिला असणार आहेत. सदरील मिरवणूक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून निघणार आहे. समित्यांचे पदाधिकारी वर्गाने करावयाची कामे यांना सांगण्यात आली, भव्य दिव्य मंडप उभारला असून पंधरा एकर परिसरात आसन व्यवस्था करण्यात आली आहे. पन्नास हजार भक्त बसतील अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे,बाहेर गावाहून येणाऱ्या भक्तांची निवास व्यवस्था करणार आहेत. या प्रसंगी नियोजक प्रेम राजपूत,नगरसेवक गणेश खैरे, दिनेश राजपूत, कैलास साखरे, पारस घाटे, गोकुळ भूजबळ सोनू राजपूत, मनोज राजपूत, शैलेश पोंदे,बंकटसिंह राजपूत,प्रल्हाद राजपूत, प्रमोद राऊत,गणेश चंदवाडे, नवीन श्रीवास्तव, ऍड.संदीप डोंगरे,अशोक आप्पा पवार,सोमु सोमवंशी, चंद्रपाल राजपूत,धीरज राजपूत यांच्या सह शहरातील सर्व मंडळाचे कार्यकर्ते हजर होते.



# आरंभ प्रतिष्ठानच्या वतीने पुरातन मंदिरांचे ट्रस्टी व सेवेकरी यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आरंभ प्रतिष्ठानच्या वतीने मकर संक्रांतीचे औचित्य साधून प्रभादेवी/दादर/महिम विभागातील पुरातन मंदिरांचे वर्षानुवर्षे देवाची भक्ती, सेवा, पूजाअर्चा करून देवस्थान जागृत ठेवण्यासाठी मनोभावे सेवा करणारे ट्रस्टी व सेवेकरी यांचा श्रीफळ व पुष्पगुच्छ, मानाची शाल, सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. ह्या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती कार्यसम्राट आमदार कालिदास कोळंबकर साहेब, स्थानिक आमदार सदा सरवणकर, माझी नगरसेवक नाना आंबोले, भाजपा ओबीसी सेल अध्यक्ष नरेंद्र गावकर व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, विविध मंडळ आणि संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्तेचा सहभाग वाखण्याजोग होता. तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रमुख आयोजक संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत धावले, इंद्रजित तिवारी, विकास माने, जितेंद्र कांबळे, चारुहास हंबीरे, जयवंत पवार, विकेश जैन, ओमकार गुरव, जितेंद्र गुप्ता, दादा शिरसेकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

# ट्रॅक्टरने चिरडल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :**पिकांना पाणी देण्यासाठी गेलेल्या तरुण शेतकऱ्याच्या अंगावरून वाळूने भरलेले ट्रॅक्टर गेल्याने त्याचा मृत्यू झाला. ही घटना अमळनेर तालुक्यातील मांडळ येथे घडली. या मृत्यूस वाळूमाफिया जबाबदार असल्याचा आरोप संतप्त नातेवाइकांनी केला असून, दोषींवर कारवाई करावी, या मागणीसाठी मृतदेह थेट तहसील कार्यालयात नेण्यात आला. पोलिसांनी नातेवाईकांची समजूत काढल्यानंतर अंत्यसंस्कार करण्यात आले. जयवंत कोळी ( ३६ ) हे रात्री शेतात पाणी देण्यासाठी गेले होते. सकाळी त्यांच्या अंगावरून वाळूचे ट्रॅक्टर गेल्याने ते गंभीर जखमी झाल्याची माहिती नातेवाईक आणि ग्रामस्थांना दिली.

# श्री विठ्ठल कारखान्याच्या वजन काट्यावर वैद्यमापन विभागाकडून शिक्कामोर्तब



आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** तालुक्याचा आर्थिक कणा असणाऱ्या श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर काल वैद्यमापन विभागाची अचानक भरारी पथक आले असता त्यांनी केलेल्या तपासणीत पथकास कारखान्याचे सर्वच वजनकाटे बरोबर असल्याचे आढळून आले, त्यामुळे वजनात कोणताही गैरप्रकार नसल्याचे भरारी पथक व वैद्यमापन अधिकाऱ्यांकडून शिक्कामोर्तब करण्यात आले. गेल्या काही महिन्यात श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक पार पडली. चेअरमन अभिजीत पाटील यांनी सतत आपल्या भाषणातून शेतकऱ्यांना विश्वास देत होते की, काटा कुठूनही करून या, शेतकऱ्यांच्या ऊसाचा काटा मारणार नाही असा प्रामाणिक विश्वास देत होते. त्यावर दिनांक १७जानेवारी२०२३ रोजी वैद्यमापन

> काटा कुठूनही करून या, असे चेअरमन व संचालक मंडळांनी जाहीर केल्याने श्री विठ्ठल कारखाना हा शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून काम करत आहे . नेहमीच शेतकऱ्यांच्या विश्वासाला जपत असल्याने ५ लाख मे .टन गाळप यशस्वी करू शकलो असे कारखान्याचे प्र . कार्यकारी संचालक डी .आर गायकवाड यांनी सांगितले .

पथकाने अचानक भेट देऊन शिक्कामोर्तब करण्यात केले आहे. अलीकडच्या काळात आपण बघतो की, बाहेरील कारखान्याचे काटेमारीचे प्रमाण वाढले आहे. परंतु चेअरमन अभिजीत पाटलांनी कोणालाही न जुमानता भागातील शेतकरी सुजलाम सुफलाम झाला पाहिजे त्यांची आर्थिक उन्नती होऊन शेतकऱ्यांना चार पैसे मिळावेत याकरता कारखान्याचे सर्व संचालक मंडळ प्रयत्न करीत आहेत. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना गेली २ ते ३वर्षे बंद अवस्थेत असताना सुरू करणे हे तगडे आवाहन होते. त्या आवाहनाला सामोरे जात कारखान्याने १५ जानेवारी पर्यंत ५लाख मेट्रिक टन उसाचे गाळप पूर्ण केले आहे.तसेच मागील हंगामातील शेतकऱ्याची थकीत देणे देऊन शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे. वैद्यमापन विभागाच्या तपासणीत कारखान्याच्या काट्यावर कोणताही गैरप्रकार प्रकार अथवा वजनात तफावत नसल्याचे आढळून आले आहे त्यामुळे वैद्यमापन विभागाच्या भरारी पथकाने देखील कारखान्याच्या प्रशासनाचे कौतुक केले आहे. वैद्यमापन तपासणी पथकामध्ये निरीक्षक वैद्यमापन शास्त्र सी.बी गायकवाड, महसूल नायब तहसीलदार पंडित कोळी, लेखापरीक्षक श्रेणी१ पी.आर. शिंदे यांचेसह शेतकरी प्रतिनिधी अमोल विठ्ठलराव रणदिवे, सिताराम रणदिवे तसेच कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक, वर्क्स मॅनेजर व केनयार्ड सुपरवायझर उपस्थित होते.



# कापसाच्या दरात घसरण सुरुच; शेतकरी मेटाकुटीला

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळ राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सध्या कापसाचे बाजारभाव हे उलट्या दिशेने सुरू असून यामध्ये सातत्याने घसरण होताना पाहायला मिळत आहे. यावर्षीचा विचार केला तर भाव वाढीच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी आधीपासूनच कापूस साठवणुकीवर भर दिला आणि त्यामुळे बाजारपेठेत कापूस विक्रीसाठी हवा तेवढा प्रमाणात उपलब्ध न झाल्याने पुरवठा अत्यल्प असा होत आहे. मागील वर्षी कापसास चांगला दर मिळाल्याने सोयगाव तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी यंदा कापसाची लागवड केली. पावसाचा फटका बसून उर्वरीत कापूस शेतकऱ्यांनी हजारो रूपये खर्चुन वेचून घेतला. कापसाला चांगला भाव मिळेल, या आशेवर शेतकरी होते. परंतु दिवसागणिक कापसाचे भाव कोसळत असल्याने शेतकऱ्यांच्या काळजाचा ठोक चुकला आहे. मागच्या वर्षीचा विचार केला तर कापसाला कधी नव्हे एवढे उच्चांकी दर मिळाले होते. यावर्षी देखील तीच अपेक्षा शेतकरी बांधवांना असल्यामुळे कापूस विक्रीसाठी बाहेरच काढला नसल्याने जवळजवळ ८५ ते ९० टक्के कापूस अजून देखील शेतकऱ्यांच्या घरातच आहे. यामुळे जिनिंग मिल देखील अडचणी सापडले आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा विचार केला तर या ठिकाणी असलेली कापसाचे मागणी देखील खूपच कमी असल्याने कापसाचे दर घसरले आहेत. जर यावर्षी हंगामाचा विचार केला तर आपण ऑक्टोबर महिन्यामध्ये कपाशी खरेदीला साधारणपणे सुरुवात झाली व त्यावेळी साडेनऊ ते दहा हजार रुपयांपर्यंतचा दर मिळाला होता. त्या तुलनेत आत्ताची स्थिती पाहिली तर कापूस तब्बल ७५०० ते ८००० रुपये क्विंटल वर येऊन पोहोचला आहे. म्हणजेच गेल्या दोन महिन्याचा विचार केला तर, त्या तुलनेत आत्तापर्यंत तब्बल अडीच हजारांनी दर घसरले आहेत. त्यामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. मागच्या वर्षी जो काही कपासाला चांगला भाव मिळाला होता. त्यामुळे शेतकऱ्यांचा काहीसा कल हा भाव वाढीच्या दिशेने होता. परंतु ही अपेक्षा फोल ठरताना दिसून येत आहे. यावर्षी



ऑक्टोबर महिन्यात जेव्हा कपाशी खरेदीला सुरुवात झाली. तेव्हा नऊ हजार ते दहा हजार दरम्यान बाजार भाव मिळाला. साहजिकच येणाऱ्या काळात देखील भाव वाढतील, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी कापूस विक्रीसाठी आणलाच नाही. त्यानंतर काही दिवसांनी दर कमी होण्यास सुरुवात झाली. त्यामुळे जो काही कापूस बाजारपेठेत येत होता तो देखील विक्रीला येणे बंद झाले. त्याच्यामुळे पुरवठ्यावर त्याचा विपरीत परिणाम झाला. दुसरी महत्वाची बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये रुईची मागणी नसल्यामुळे कापसाचे दर कमी आहेत. सध्या कापसाचा बाजार भाव ७५०० ते ८००० रुपये प्रतिक्विंटल पर्यंत आहे. त्यामुळे आता झालेल्या घसरणीचा विचार केला तर दोन महिन्यात तब्बल अडीच हजार रुपयांनी दर पडले आहेत. शेतकऱ्यांचा जवळजवळ ८५ ते ९० टक्के कापूस घरात पडून राहिल्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक गणित देखील कोलमडले आहे.

**वजन मापक विभाग गायब :** गेल्या दोन वर्षांपासून व्यापारी बिनदिक्कतपणे काटे चालवतात, याकडे जाणून बुजून सदरील विभाग कानाडोळा करत आहेत . परीसरातील सराईत व्यापारी यांचे फावत आसल्याची चर्चा शेतकऱ्यांमधून ऐकावयास मिळत आहे .

**मो .आरिफ मो .लुखमान,** शेतकरी तथा प्रभारी सरपंच सावळदबारा



**शहादा ते मुंबई जाणाऱ्या एसटी बसला चांदवड तालुक्यातील राहुड घाटात आग लागली. या आगीने बघता बघता रौद्र रूप धारण करीत बसला कवेत घेतले, यावेळी बस चालकाने सतर्कता दाखवत बस महामार्गाच्या कडेला उभी करत, बसमधील ३५ प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. यावेळी मंगरूळ टोल नाक्यावरील अग्निशमन दलाच्या गाडीने त्वरित घटनास्थळी पोहचून आगीवर नियंत्रण मिळवल्याने पुढील अनर्थ टळला.**

# गंगाई-बाबाजी महोत्सवामुळे मन समृद्ध होते : प्रा. डॉ. दासू वैद्य

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** राज्य भरात दरवर्षी अनेक प्रकारचे महोत्सव होतात मात्र आष्टी येथे होणाऱ्या गंगाई-बाबाजी सांस्कृतिक महोत्सवामुळे आपली मने समृध्द आणि संपन्न होतात, असे प्रतिपादन प्रसिद्ध चित्रपट गीतकार, कवी, व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. दासू वैद्य यांनी केले. शेतकरी शिक्षण प्रसारण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार भिमराव धोंडे यांच्या आई वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ भगवान महाविद्यालयात आयोजित गंगाई-बाबाजी महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. माजी आ. भिमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या उद्घाटन समारंभास डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठाचे नवनियुक्त सिनेट सदस्य अजय दादा धोंडे, भगवान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, आनंदराव धोंडे महाविद्यालय (कडा) चे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, बापू काका धोंडे, भाजप चे तालुका अध्यक्ष साहेबराव म्हस्के, मुर्षदपुर चे सरपंच संतोष चव्हाण, बीड जिल्हा परिषदेचे माजी सभापती नियामत भाई बेग, अज्जू भाई शेख, शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, रामदास औटी, प्रा. अल्लाउद्दीन सय्यद, अशोकराव भोगडे, ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे, प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, युवानेते अभय दादा धोंडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना प्रा. डॉ. दासू वैद्य म्हणाले की, जपानी माणसाला २ पैसे दिले की एक पैश्याची तो भाकरी विकत घेतो आणि एक पैश्याचे फुल विकत घेतो. भाकरी मुळे त्याचे पोट भरते तर फुला मुळे त्याचे मन भरते. कारण केवळ पोट भरून उपयोग नाही तर आपले मनही समृध्द आणि संपन्न झाले पाहिजे. त्यासाठी कथा, कविता, नृत्य, गाणी, विचार या सर्व गोष्टी गंगाई-बाबाजी सांस्कृतिक महोत्सवातून मिळणार आहेत. त्यामुळे आपल्या सर्वांच्या मनाचा विचार करणारा हा महोत्सव आहे.

अध्यक्ष मा. आ. भीमराव धोंडे म्हणाले की, सर्व महाविद्यालयातून कॉपीची प्रथा बंद झाली पाहिजे. सर्वांनी आपल्या आई वडिलांचा सन्मान करून त्यांचे स्मरण केले पाहिजे. आपल्या परिसरातूनही आय. ए. एस. अधिकारी निर्माण झाले पाहिजे. त्यासाठी प्राध्यापकांनी गुणवत्ता पूर्वक शिक्षण दिले पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ आपल्या प्रास्ताविक पर भाषणात म्हणाले की, आपल्या आई वडिलांबद्दल समाजामध्ये जाणीव जागृती व्हावी, साहित्य, कला, क्रीडा व संस्कृतीचे जतन, संवर्धन या उद्देशाने शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार यांच्या संकल्पनेतून २० वर्षांपूर्वी गंगाई-बाबाजी महोत्सव सुरू झाला.



# वरिष्ठ विद्यालयाच्या वतीने निळया फाउंडेशन पुणे यांच्यामार्फत व्याख्यानमाला

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील कालिंका देवी शिक्षण संस्था संचलित कैलासवासी लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील कला वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने दि.१८/१/२०२३ रोजी आज निळ्या फाउंडेशन पुणे यांच्यामार्फत जाहीर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. यावेळेस करिअर व लाईफस्टाईल याविषयी सविस्तर मार्गदर्शन डॉक्टर धनंजय कुलकर्णी यांनी केले. यावेळेस निलया फाउंडेशनचे प्राध्यापक कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, आपल्या आयुष्यामध्ये जर आपण कोणत्याही प्रकारचे ध्येय समोर ठेवले नाही तर आपण यशस्वी होऊ शकत नाही. कारण ध्येय असेल तेव्हाच मार्ग दिसतो व योग्य मार्गाने मार्गक्रमण करणे हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षण हे मनापासून घेतले पाहिजे व आपले ध्येय निश्चित केले पाहिजेत. ध्येयपूर्तीसाठी प्रत्येकाच्या अंगामध्ये नेतृत्व जिज्ञासा आवश्यक असते. वाणिज्य शाखा असेल तर आपण कोणत्या क्षेत्रामध्ये प्रगती करू शकतो. विज्ञान शाखा असेल तर मेडिकल क्षेत्रामध्ये कोणते नवीन बदल आणू शकतो. कलाक्षेत्र असेल तर आपल्या अंगी असलेल्या कलागुणांना व एमपीएससी, यूपीएससी सारख्या परीक्षांच्या तयारी करून आपण क्लासवन अधिकारी होऊ शकतो. यासाठी प्रत्येकाने ध्येय निश्चित ठेवावे. प्रस्तावित जीवन कोलते व सूत्रसंचालन पडोल सर यांनी केले. वरिष्ठ महाविद्यातील प्राचार्य जयराम घोती, शिक्षकबंधू विकास पाटील, विजयसिंह राजपूत, भास्कर ससाने, विनोद जाधव, सुदाम राठोड, पोपटराव सोनवणे, शिवाजी सत्रे, प्राध्यापक योगेश थोटे, दीपक सिसोदे, किशोर चोपडे, योगेश राठोड, सुनील कुमार चव्हाण, योगेश शेळके, प्रवीण महाले, अनिता घोडके, संजय अमृतकर, हिरालाल सोनवणे, अनिल सुरडकर, मनोहर पडोळ, सतीश गावंडे, मोहन बोरे, सतीश खवले, गणेश मोहने, सुभाष राठोड, विकास पंडित व शिक्षकेतर कर्मचारी विनोद राठोड राहुल बडक गजानन चव्हाण उपस्थित होते.

# नात्याला काळिमा फासणारी घटना; बापानेच केला सात महिन्याच्या मुलाचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** वडील आणि मुलाच्या नात्याला काळीमा फासणारी धक्कादायक घटना पंढरपुरात समोर आली आहे. स्वतःच्या सात महिन्याच्या मुलाचा कॅनालच्या पाण्यात टाकून खून केल्या प्रकरणी सुभाष साहेबराव डुकरे या संशयित आरोपी बापास पोलिसांनी अटक केली आहे.



आरोपी आपल्या कुटुंबासमवेत ऊसतोडीच्या कामासाठी पंढरपूर तालुक्यातील सुपली गावात आले होते. 28 डिसेंबर रोजी पंढरपूर पासून जवळ असलेल्या, सुपली हद्दीतील उजनी उजवा कालव्यामध्ये एक लहान मुलगा पडून मयत झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक धनंजय जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने सुपली येथील कॅनल जवळील घटनास्थळाकडे धाव घेतली असता, सात महिन्याचा विक्रांत नावाचा मुलगा कॅनॉलमधील साठलेल्या पाण्यामध्ये पडलेला दिसून आला. संशयित आरोपी वडील सुभाष साहेबराव डुकरे (रा. बाभूळगाव, जि.नांदेड) यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी टोळी मुकादमावर संशय घेतला होता. पोलिसांनी संशयित मुकादमाची चौकशी केली असता त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. दरम्यान पोलिसांनी आरोपी वडील सुभाष डुकरे यांची अधिक चौकशी केली ही धक्कादायक बाब समोर आली आहे. प्रथम दर्शनी पोलिसांनी आरोपी बापाच्या विरोधात खूनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. खूनाचे कारण मात्र अद्याप समोर आले नाही.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टॅंड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


# फुफ्फुसात अडकलेली सुई काढण्यात डॉक्टरांना यश

## कमलनयन बजाज रुग्णालय : तरुणाला मिळाले जीवदान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** तेहतीस वर्षीय शेतकरी कुटुंबातील तरुणाच्या फुफ्फुसात चार वर्षांपासून अडकलेली सुई शस्त्रक्रिया करून यशस्वीरीत्या काढण्यात यश आले. कमलनयन बजाज रुग्णालयातील डॉक्टरांच्या प्रयत्नांमुळे त्या तरुणाला एकप्रकारे जीवदान मिळाले आहे.

तोंडात धरलेली सुई खोकला आल्याने थेट गिळली गेली व ती फुफ्फुसात जाऊन अडकली. कालांतराने खोकला आल्यावर तोंडातून रक्त पडू लागल्याने रुग्ण व नातेवाईकांची चिंता वाढली. चार वर्षांपासून हा त्रास त्या रुग्णाला होत होता. जालना जिल्ह्यातील या तरुणाने सुरुवातीला चार



ते पाच ठिकाणी निदान करण्याचा प्रयत्न केला. परंतु, यश आले नाही. त्याला कमलनयन बजाज रुग्णालयातील तज्ज्ञांना दाखवले असता विशिष्ट चाचण्या करण्यात आल्या. त्यात त्याच्या उजव्या फुफ्फुसाच्या खालच्या भागात सुई अडकल्याचे स्पष्ट झाले. शस्त्रक्रिया करून ही सुई काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

कमलनयन बजाज रुग्णालयातील कान-नाक-घसा तज्ञ डॉ. अमोल सुलाखे यांनी रुग्णाची RIGID BRONCHOSCOPY यशस्वीरीत्या करून C-ARM च्या साहाय्याने फुफ्फुसात अडकलेली सुई काढण्यात डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांना यश आले. विशेष म्हणजे शस्त्रक्रिया झाल्यानंतर दोनच दिवसांनी रुग्णाला सुटी देखील मिळाली. या यशाबद्दल कमलनयन बजाज रुग्णालयाचे विश्वस्त सी. पी. त्रिपाठी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नताशा वर्मा व वैद्यकीय संचालक डॉ. मिलिंद वैष्णव यांनी डॉ. सुलाखे व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.



सहा महिने ते तीन वर्षे वयोगटातील लहान मुलांना कोणतीही वस्तू तोंडात धरण्याची सवय असते. अपघाताने चुकून एखादी वस्तू गिळली गेल्यावर पालकांनी तात्काळ निदान व उपचार आवश्यक असतो. बालरोग तज्ञांकडे नेऊन त्वरित उपचार न मिळाल्यास त्या बाळाच्या जीवितास धोका होऊ शकतो. तरुणाच्या फुफ्फुसात अडकलेली सुई त्याच्या जीवास धोका निर्माण करणारी बाब होती. त्या वस्तूचे इन्फेक्शन अर्थात संसर्ग वाढला असता तर परिस्थिती गंभीर झाली असती. मागील तीस वर्षांपासून सोळाशेपेक्षा अधिक फॉरेन बॉडी अर्थात विजातीय वस्तू काढल्या आहेत, असे डॉ. अमोल सुलाखे यांनी आवर्जून सांगितले.



# जि.प.के.प्रा.शा. सावळदबारा येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमास सुरुवात महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग व जिल्हा परिषद औरंगाबाद शिक्षण विभाग यांच्या परिपत्रकानुसार, दिनांक 14 जानेवारी ते 28 जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याच्या आदेशानुसार, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सावळदबारा तालुका सोयगाव जिल्हा औरंगाबाद येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत विविध उपक्रमांची सुरुवात करण्यात आली आहे. त्यातील आज तृतीय दिनी मराठी साहित्यक, कवि आपल्या भेटीला या उपकरमतून मराठी कवी, साहित्यिक तसेच जि.प.प्रा. शाळा मोलखेडा येथील मुख्याध्यापक कविवर्य आनंदा भगवान वारांगणे सर यांच्या कविता गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात त्यांनी माऊलींचा कर्मयोग, जगद्गुरु तुकोबारायांचे शब्द धन इ.कविता संग्रहातील प्रसिद्ध अशा अनेकविध कवितांचे सुमधुर गायन केले. त्यांनी व्यसन मुक्ती साठी दारू का पिऊ बाबा हि समाज प्रबोधनपर कविता सादर करून मुलानं मध्ये जन जागृती करून विद्यार्थ्याचे मराठी भाषेविषयीचे ज्ञान , शब्द संपत्ती वाढवली.

या कार्यक्रमाची सुरुवात क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. विद्यार्थ्यांनी कवितांचा मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमाचे उ्घाटक श्रीमती एस.बी.राठोड मॅडम होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री एम. डी. सोनीने हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून कवी श्री आनंदा वारांगणे सर तसेच सेवानिवृत्त ज्येष्ठ पदवीधर शिक्षक आर.एच. चव्हाण सर हे उपस्थित होते. या प्रसंगी श्री एम.डी. सोनोने सर व भागवत गायकवाड सर यांनी प्रमुख अतिथी कविवर्य आनंदा वारांगणे सर यांचे शाळेच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले. तसेच कार्यक्रमाचे उदघाटक श्रीमती एस.बी राठोड मॅडम यांनी विद्यार्थ्यांना आव्हान केले की आपल्या दैनंदिन जीवनात जास्तीत जास्त मराठी शब्दांचा वापर करावा. विविध मराठी लेखकांची पुस्तके वाचावी जेणे करून मराठी भाषा समृध्द होण्यासाठी मदत होईल. कविवर्य आनंदा वारांगणे यांनी त्यांचे कवितासंग्रह शाळेतील ग्रंथालयासाठी भेट दिले.या कवी संमेलनाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश ढोणे सर यांनी केले. याप्रसंगी प्रास्ताविक भागवत गायकवाड सर यांनी तर फलक लेखन गवई सर यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्रीमती निता. हिरास मॅडम यांनी केले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

# सांगोला तालुक्यात विद्यार्थिनीचा विनयभंग; रंगेल मास्तरला बेड्या

## अल्पवयीन विद्यार्थिनीशी करीत होता लगट !

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** गुरु शिष्याच्या पावित्र्याला कलंकीत करीत एका रंगेल शिक्षकाने आपल्याच विद्यार्थिनीचा ज्ञानमंदिरातच विनयभंग केल्याची संतापजनक घटना पुन्हा एकदा समोर आली असून शिक्षकी पेशाला डाग लावणाऱ्या 'मास्तर' ला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

शिक्षणाच्या मंदिरात ज्ञानदानाचे पवित्र कार्य चालत असते आणि येथे गुरु शिष्याचे पवित्र नाते जपले जात असते. अशाच ठिकाणी स्वतःला शिक्षक म्हणवणाऱ्या नराधम आणि रंगेल मास्तरने आपला आणखी एक वेगळा रंग दाखवत अल्पवयीन विद्यार्थिनीशी लगट करीत विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील एका शाळेत घडला आहे. शाळेतील फळ्यासारखा अंतर्बाह्य काळा असलेल्या शत्रुघ्न भांगरे नावाच्या नराधमाने नवव्या इयत्तेत शिकणाऱ्या एका विद्यार्थीनिशी



लगट करण्याचा प्रकार केला आहे. शाळेचे स्नेहसंमेलन सुरु असताना या नालायक शिक्षकाने कार्यक्रम सुरु असताना एका मुलीला स्टेजच्या मागे असलेल्या एका वर्गात बोलावून घेतले. कवितेची वही देण्याचे निमित्त करून त्याने बोलावले आणि शिक्षकाने बोलावले म्हणून ही मुलगी देखील वर्ग खोलीत गेली. तेथे या नराधमाने या मुलीशी लगट करण्याचा प्रयत्न केला. सेल्फी काढू म्हणत तिला जवळ ओढून घेऊ लागला आणि सेल्फी काढली. यावेळी त्याने या मुलीला घट्ट मिठी मारली. दरम्यान हा प्रकार त्याच शाळेतील एका शिक्षकाने पाहिला आणि त्यामुळे नालायक शिक्षकाने या मुलीला सोडले.

त्यानंतरही या नालायकाने सदर मुलीला फोन करून या घटनेबाबत कोणाला काही सांगू नको, उलट ज्या शिक्षकाने हे पहिले होते तोच शिक्षक त्रास देतो असे आपण सांगू, आपल्या दोघांना बदनाम करण्यासाठी ते शिक्षक काहीही करतील' असे सांगितले. सदर मुलीने घडलेली घटना घरी आपल्या पालकांना सांगितली तेंव्हा पालकांनी शाळेला जाब विचारला.

एवढा धक्कादायक प्रकार घडला असतानाही तब्बल १८ दिवस हे प्रकरण अंधारात ठेवले गेले आणि अखेर मुख्याध्यापक रफिक मणेरी यांनी पोलिसात तक्रार दिल्यानंतर सांगोला पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल करून नालायक शिक्षकाला बेड्या ठोकल्या आहेत. सदर शिक्षकाचा इतिहास 'असाच' असून नाझरे येथेही त्याच्यावर काळा डाग लागलेला आहे. एवढी मोठी संतापजनक आणि तितकीच धक्कादायक घटना घडूनही त्याच्यावर तक्रार देण्यासाठी १८ दिवस का लागले ? हा एक प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेत नालायकपणा करणाऱ्या या 'मास्तर' ला वाचविण्याचा कुणी प्रयत्न करीत होते काय ? एवढा अपराध करूनही त्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न नेमका कुणी केला हे देखील समोर येण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

सदर मुलीच्या पालकांचा आणि गावकऱ्यांचा रोष वाढू लागल्यामुळे हे प्रकरण पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचले अन्यथा हा प्रकार दडपला गेला असता अशी चर्चाही सुरु झाली आहे. या नालायक शिक्षकाला वाचविण्याचा प्रयत्न कुणी केला त्याचाही मुखवटा ओरबाडून काढण्याची गरज असल्याचा संताप व्यक्त होऊ लागला आहे. या घटनेबाबत देखील चौकशी केली जावी अशी मागणीही पुढे येताना दिसत आहे.

# 80 हजार घरकुल फॉर्म गहाळ करणाऱ्या मनपाला भाकप जाब विचारणार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** 2016 पासून जवळपास 80 हजार बेघर, नवीन लग्न झालेली जोडपी, भाडेकरुंनी मनपा औरंगाबादकडे जमा केलेले फॉर्म कुठे आहेत याचा जाब विचारण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे मनपा टाऊन हॉल कार्यालयासमोर 19 जानेवारी 023 रोजी दुपारी 3 वाजता निदर्शने करण्यात येणार आहेत. या निदर्शनात सर्व बेघरांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे. याबाबत असेल की, गेल्या अनेक वर्षांपासुन जवळपास 80 हजार बेघर, भाडेकरु, मोठ्या कुटुंबातील नवीन लग्न झालेल्या जोडप्यांनी महानगरपालीका औरंगाबादकडे घरकुलाची मागणी केली आहे.

त्यांना २०/१/२०२३ पर्यंत सोबत दिलेल्या जाहीर प्रगटनाप्रमाणे मागणी करता येईल असे मनपाकडून जाहीर प्रगटनाद्वारे सांगण्यात आले. जूने ८० हजार फॉर्म म.न.पा.कडून गहाळ झाल्याची बातमी वर्तमानपत्रात आली. मनपाच्या जाहिर प्रगटनात पूर्वी अर्ज दाखल केलेल्यांनीही आणि नवीन अर्जदारांनाही अर्ज करायचे आहेत, असे म्हटले आहे. जुने फॉर्म कुठे गेले याचा खुलासा मनपाने केलेला नाही. घरकुलाच्या मागणीसाठी नुसते फॉर्म भरून चालणार नाही, तर म.न.पा.च्या कारभारावर लक्ष ठेवावे लागेल, संघर्ष करावा लागेल. फॉर्म गहाळ करून ८० हजार पात्र अर्जदारांना अपात्र दाखवण्याचा प्रकार असू शकतो. जागरूक नागरीकांचा मेळावा भारतीय कम्युनिस्ट पक्ष कार्यालयात झाला व 19 जानेवारी 023 रोजी दुपारी 3 वाजता मनपा टाऊन हॉल कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत. निदर्शनात मोठ्या संख्येने बेघर, नवीन लग्न झालेली जोडपी, भाडेकरुंनी सहभागी व्हावे असे आवाहन ॲड.कॉ. अभय टाकसाळ (शहर सेक्रेटरी व राज्य कार्यकारिणी सदस्य) कॉ. अनिता हिवराळे (शहर सह सेक्रेटरी), कॉ. माया भिवसने (शहर सह सेक्रेटरी), कॉ. विकास गायकवाड, कॉ. रफिक बक्श, कॉ. राजु हिवराळे, कॉ. माधुरी जमधडे, कॉ. प्रकाश बनसोड, कॉ. सुरेश ठोंबरे, कॉ. जफर फजलु रहेमान,कॉ. मनिषा भोळे, कॉ. सुभाष साबळे, कॉ.नीता किर्तीशाही, डॉ. एस. एम. नईम ईत्यादीनी केले आहे.


नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद